




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २२२ * नांदेड * शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# आमदारांना अपात्र करण्याचा आम्हाला अधिकार!

## शिवसेना पक्ष आणि चिन्ह सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाची टिप्पणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पक्षांतर निर्णयावर अध्यक्ष अपयशी ठरल्यास कोर्ट त्यावर निर्णय घेऊ शकतं. पक्षांतर निर्णयावर सुप्रीम कोर्ट ननिर्णय घेऊ शकतं. तसेच आमदारांना सुप्रीम कोर्ट अपात्र ठरवू शकतं, असा जोरदार युक्तिवाद ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी गुरूवारी सर्वोच्च न्यायालयात केला. त्यावर आम्हाला आमदार अपात्र करण्याचा अधिकार आहे, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. या सुनावणीतील सर्वोच्च न्यायालयाची ही टिप्पणी अत्यंत महत्त्वाची आहे. या टिप्पणी निकालासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचं मानलं जात आहे. त्यामुळे कोर्टाने आधीच ही टिप्पणी केल्याने शिंदे गटासाठी ही धोक्याची घंटा तर नाही ना? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.



ठाकरे गटाचे वकील देवदत्त कामत यांनी काल सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला. त्यानंतर त्यांनी आज आपला युक्तिवाद सुरू ठेवला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर हा युक्तिवाद सुरू आहे. कामत यांनी आजच्या सुनावणीत अपात्रतेच्या मुद्द्यावर सर्वाधिक भर दिला. त्यावर कोर्टानेही आम्हाला आमदार अपात्र करण्याचा अधिकार असल्याची टिप्पणी केली.

न्यायाच्या उद्देशाची पूर्तता होणे हाच अंतिम निकष आहे. पूर्ण न्याय देण्यासाठी हे न्यायालय स्वतःच संबंधित सदस्याला अपात्र ठरवू शकते. महापालिकेतील नगरसेवकांच्या अपात्रतेचे काही निकालही आहेत. या प्रकणांमध्ये सक्षम प्राधिकरणाने अपात्रता सिद्ध केलेली नसल्याचा निकाल दिलेला आहे. कोर्टाने रिट अधिकारक्षेत्रात संबंधित निकष लागू करून अपात्रता झाल्याचे निष्पन्न केले आणि स्वतःच संबंधित सदस्यांना अपात्र घोषित केले आहे. अशाच एका प्रकरणातील निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते आणि सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय कायम ठेवला आहे, याकडे कामत यांनी कोर्टाचं लक्ष वेधलं.

यावेळी कामत यांनी राजेंद्र सिहं प्रकरणाचा दाखला दिला. या प्रकरणात विधानसभा अध्यक्षांनी दहाव्या अनुसूचीचा प्रभावच निष्प्रभ करण्यास न्यायालय परवानगी देऊ शकत नाही, असं कोर्टाने म्हटलं आहे. असाधारण परिस्थितीत विधानसभा अध्यक्ष निर्णय घेण्यास अपयशी ठरल्यास सुप्रीम कोर्ट स्वतःच प्रथमदर्शनी अपात्रतेचा निर्णय घेऊ शकते, असंही कामत यांनी कोर्टाच्या निदर्शनास आणून दिलं.

राणा प्रकरणात पक्षांतर करून आमदार मंत्री झाले होते. पक्षांतराच्या तारखेपासूनच ते अपात्र ठरले असतील, तर ते कोणत्याही वैध अधिकाराशिवाय आणि लोकशाही तत्त्वांना धाब्यावर बसवून पदावर होते, असा युक्तिवाद राणा प्रकरणात करण्यात आला होता. तेव्हा विधानसभेचा कार्यकाळ संपण्याच्या जवळ आला होता आणि घटनात्मक व्यवस्था व घटनात्मक मूल्यांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते, असेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या युक्तिवादात या न्यायालयाला मोठे तथ्य असल्याचे आढळले. अखेरीस, प्रकरण पुन्हा खालच्या स्तरावर पाठवण्याऐवजी, न्यायालयाने संबंधित तारखेपासून उत्तर प्रदेश विधानसभेतील त्या सदस्यांना अपात्र घोषित केले होते, असंही त्यांनी कोर्टाला सांगितलं.

# महामार्गालगतची अतिक्रमणे निश्चित कालमर्यादेत हटविण्याचे जिल्हाधिकारी कर्डिले यांचे निर्देश

- ‘यंत्रणांनी समन्वयाने मिशन मोडवर कार्यवाही करावी’
- जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्ग अतिक्रमणमुक्त करणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे निश्चित कालमर्यादेत हटविण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद तसेच संबंधित महामार्ग यंत्रणांनी परस्पर समन्वयाने मिशन मोडवर कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ जुलै २०२६ रोजी स्वतःहून दखल घेतलेल्या याचिका व रिट याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी सदर निर्देश दिले. जिल्हाधिकार कर्डिले यांनी सांगितले की, महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर कार्यवाही करताना केवळ रस्त्याची डांबरी रुंदी विचारात न घेता संबंधित महामार्गाची अधिकृत Right of Way (ROW), मंजूर सरेखन, भूसंपादन अभिलेख, सीमांकन व प्रत्यक्ष हद्द यांची खातरजमा करावी. प्रत्येक ठिकाणी अतिक्रमणाचे डिमार्केशन करून महामार्गाची अधिकृत हद्द निश्चित करावी. आवश्यक त्या ठिकाणी महसूल, महामार्ग विभाग व स्थानिक प्रशासन यांच्या संयुक्त पथकाद्वारे मोजणी व सीमांकनाची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागांनी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी. अतिक्रमणधारकांना नियमानुसार पूर्वसूचना देऊन निर्धारित कालावधीत अतिक्रमण स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन करावे. त्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्यास कायद्यानुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात यावी. कार्यवाहीसाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेण्यात यावा. कोणत्याही कारणामुळे कार्यवाहीला विलंब होऊ नये, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या विविध मार्गांची हद्द व ROW रस्त्यानुसार वेगवेगळी असल्याने सरसकट निश्चित रुंदी गृहीत धरून अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही करू नये. संबंधित महामार्गाचा Final Land Acquisition Notification/Award, महसूल गाव नकाशा, मंजूर Alignment Plan, ROW Plan/Land Schedule, Chainage d Boundary Pillars तसेच संबंधित महामार्ग प्राधिकरणाची अद्ययावत संयुक्त मोजणी यांचा आधार घ्यावा, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

नांदेड शहरातील अनधिकृत अतिक्रमणे, रस्त्यांवरील अतिक्रमणे व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत बाबींवर महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. संबंधित ठिकाणांची पाहणी करून अतिक्रमणधारकांना पूर्वसूचना द्यावी. निर्धारित कालावधीत अतिक्रमणे न काढल्यास नियमानुसार निष्कासनाची कार्यवाही करावी. पार्किंगच्या ठिकाणी निर्माण झालेले अनधिकृत अडथळे दूर करून वाहतुकीसाठी आवश्यक व्यवस्था करावी, असेही निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर मिळणार, राज्य सरकारची घोषणा; १६५ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आता मोफत दप्तर मिळणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील इयत्ता १ली ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी ‘मोफत शालेय दप्तर योजना’ शालेय शिक्षण विभागाने राबवण्यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील इयत्ता १ली ते ८वीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे या उपक्रमांतर्गत मोफत शालेय दप्तर पुरविण्यासंदर्भात प्राथमिक शिक्षण संचालनायांनी निर्णय घेतला असल्याची माहिती आहे.

दरम्यान, शासनास सादर केलेल्या १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ इतक्या रकमेच्या प्रस्तावास अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अशातच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता १ ली ते ५ वी व इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतच्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन दप्तर (डलहेश्र इरस) पुरविण्यासाठी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील विहित अटी, शर्तींच्या अधीन राहून ई-निविदा राबवून खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. तर घेत असलेल्या विद्यार्थ्यांना दप्तरच्या किंमतीमध्ये DESIGN, SUPPLY वरील बाबीसाठी वेगवेगळ्या किंमती दर्शविणार असल्यास संबंधित निविदा विचारात घेतली जाणार नाही, अशी देखील माहिती आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे (सायन्स कीट, प्रयोगशाळा साहित्य, डेस्क बेंच, शैक्षणिक साहित्य इ.) या योजनेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

# राज्यात आता सुट्टे तेल विकण्यास बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)–** दूध भेसळविरोधात कडक पावले उचलल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासनाने सर्वसामान्यांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या खाद्यतेल व्यवसायावर आपला मोर्चा वळवला आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी खाद्यतेलाच्या संदर्भात एक विशेष ‘कम्प्लायन्स ऑर्डर’ (अंमलबजावणी आदेश) जारी केली आहे. या आदेशानुसार राज्यात आता सुट्टे तेल विकण्यावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

अन्न आणि औषध प्रशासनाने नुकत्याच केलेल्या विविध तपासण्यांमध्ये खाद्यतेल क्षेत्रात खालील १२ गंभीर बाबी आणि त्रुटी निदर्शनास आल्या आहेत अनेक ठिकाणी वैध परवाना नसताना खाद्यतेलाची विक्री व प्रक्रिया सुरू आहे. खाद्यतेलात मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असून त्यात आरोग्यास घातक असणाऱ्या ट्रान्सफॅट्सचे प्रमाण प्रमाणापेक्षा जास्त आढळले आहे. रोजच्या वापरातील मोहरीच्या तेलातही भेसळ होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तेलाचा मूळ स्रोत आणि एक्सपायरी डेट लपवून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे.



वापरलेल्या, गंजलेल्या आणि अन्नासाठी अयोग्य असलेल्या डब्यांमध्ये तेलाचे पॅकिंग व विक्री केली जात आहे. अन्नसंपर्क सामग्री म्हणून घातक प्लास्टिक पॅकिंगचा वापर केला जात आहे. टँकर्सद्वारे अन्नसुरक्षेचे नियम डावलून अयोग्य पद्धतीने खाद्यतेलाची वाहतूक केली जात आहे.

नव्या आदेशानुसार खाद्यतेल व्यवसायात असलेल्या सर्व आस्थापनांना ८ ते ९ विविध प्रकारचे परवाने आणि मंजुरी घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, हा आदेश तेल बियांतून तेल काढणाऱ्यांपासून , त्यावर प्रक्रिया करणारे, वाहतूकदार आणि बाजारात अंतिम विक्री करणाऱ्या दुकानदारांपर्यंत संपूर्ण पुरवठा साखळीला लागू असणार आहे. सध्या देशातील २१२ आणि महाराष्ट्रातील २४५ प्रमुख परवानाधारक राज्यात सक्रिय असून सर्वांना या नियमांचे पालन करावे लागणार आहे.

# ‘एआय स्मार्ट गॉगल्स’च्या वापराबाबत येणार निर्बंध

**मुंबई (प्रतिनिधी)–** कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित स्मार्ट गॉगल्स आणि चष्म्यासारख्या आधुनिक उपकरणांमुळे राष्ट्रीय सुरक्षेसह नागरिकांच्या वैयक्तिक गोपनीयतेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, अशा उपकरणांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि त्यांच्या वैध वापराबाबत सर्वसमावेशक मानक कार्यप्रणाली (एसओपी) तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भातील एक सदस्यीय समितीची गुरुवारी घोषणा करण्यात आली.

# राष्ट्रीय महामार्गावरील सोनखेडच्या पुलावर तुकडे पडल्याचा धक्कादायक प्रकार

## निकृष्ट बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड येथून जाणाऱ्या नॅशनल हायवे क्र. ३६१ (नागपूर-पंढरपूर) वरील नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामातील काही भाग/तुकडे पडल्याची गंभीर घटना समोर आली आहे. पूल नुकताच बांधण्यात आलेला असताना अशा प्रकारे बांधकामाचे तुकडे पडत असल्याने पुलाच्या गुणवत्तेबाबत आणि सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या प्रकाराची तातडीने दखल घेऊन मोठी दुर्घटना व संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी पुलाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी व स्ट्रक्चरल सेफ्टी ऑडिट करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

याबाबत मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन दिले आहेत.

प्रा. मोरे सोनखेडकर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुलाचे काम पूर्ण होऊन फारसा कालावधी लोटलेला नसतानाच बांधकामाचे भाग पडत असतील, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतर शासन जागे होण्यापेक्षा दुर्घटना होण्यापूर्वीच दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.



पुलाच्या बांधकामाच्या दर्जाची स्वतंत्र तज्ज्ञ संस्थेमार्फत तपासणी करून दोष आढळल्यास संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनी केटीएल तसेच जबाबदार अधिकारी यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याचबरोबर एनएच-३६१ च्या कामासाठी हरभरा-सोनखेड तलावातून मोठ्या प्रमाणात मुरूम काढून नेण्यात आल्याची तक्रार प्रा. मोरे सोनखेडकर यांनी निवेदनात केली आहे. या प्रकरणाची यापूर्वी चौकशी व कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी म्हटले असून, प्रत्यक्षात अपेक्षित महसूलविषयक कारवाई झाली नसल्याचा आरोप केला आहे. तलावातून किती मुरूम काढण्यात आला, त्यासाठी कोणती परवानगी घेण्यात आली होती, किती रॉयल्टी भरली, वाहतूक कशी करण्यात आली आणि शासनाचा महसूल बुडाला आहे का, याची स्वतंत्र महसूल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.


शासनाचा महसूल बुडाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास कायद्यानुसार रॉयल्टी, दंड, नुकसानभरपाई व इतर सर्व शासकीय देणी संबंधितांकडून वसूल करावीत. तलावाच्या सुरक्षिततेला किंवा पर्यावरणाला नुकसान झाले असल्यास त्याचीही भरपाई संबंधितांकडून करून घ्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# नांदेडमध्ये मनपा अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळ, ओळखपत्र आणि राष्ट्रीय गणवेश बंधनकारक

## आयुक्तांचे कडक आदेश, तपासणीसाठी विशेष पथक गठीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या प्रशासनात शिस्त आणि पारदर्शकता आणण्यासाठी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी एक अत्यंत महत्त्वाचे परिपत्रक निर्गमित केले आहे. या परिपत्रकानुसार, महापालिकेतील सर्व श्रेणीतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत वेळेवर उपस्थित राहणे, ओळखपत्र परिधान करणे आणि वर्ग- ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय गणवेशात अर्थात शुभ्र वस्त्र परिधान करुन कार्यालयात हजर राहणे सक्तीचे करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक प्रशासकीय कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.

शहरातील नागरीक त्यांच्या कामासाठी पालिकेच्या मुख्य कार्यालयात व विविध विभागात येत असतात त्यांच्या कामाशी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे नांव व पदनाम अवगत होण्यासाठी आणि ओळख पटण्यासाठी ओळखपत्राचा वापर करणे यापुढे बंधनकारक असणार आहे. या परिपत्रकाची अंमलबजावणी केवळ कागदावर राहू नये, यासाठी मनपा आयुक्तांनी एका विशेष तपासणी पथकाची स्थापना केली आहे. या पथकाचे प्रमुख उपायुक्त अभिजीत वायकोस हे असणार आहेत तर या पथकामध्ये कार्यालय अधिक्षक कल्याण घंटेवाड, वरिष्ठ लिपिक शिवकुमार ठोंबरे, श्रीरंग पवळे व सोमेश्वर तांबोळी यांचा समावेश करण्यात आला आहे. हे पथक महापालिकेच्या विविध विभागांमध्ये, क्षेत्रिय कार्यालयांमध्ये कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय औचक तपासणी करेल. या पथका मार्फत अधिकारी व कर्मचारी वेळेत हजर आहेत की नाही, याची तपासणी केली जाईल. गणवेश आणि ओळखपत्र नसलेल्या कर्मचाऱ्यांची जागेवरच नोंद घेतली जाईल. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अहवाल थेट आयुक्तांकडे सादर केला जाईल.



# जंतर मंतर आंदोलनात पोलिसी बळाचा वापर, आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून चौकशी समिती स्थापन

## माजी न्यायमूर्तींची अध्यक्षपदी नियुक्ती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जंतर मंतर येथे कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यीय उच्चाधिकार समितीची स्थापना केली आहे. या समितीचे अध्यक्षपद सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी भूषवतील. इतर सदस्यांमध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती रवी शंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषी कुमार शुक्ला आणि मेघालयाचे निवृत्त डीजीपी डॉ. एल. आर. बिश्नोई यांचा समावेश आहे.

ही समिती पेलेट गन, इलेक्ट्रिक बॅटन, लाठीचार्ज आणि अश्रुधूर यांच्या अतिवापराची चौकशी करेल. तसेच महिला आंदोलकांवरील कथित हिंसाचार, पोलिसांची पाळत, जमाव नियंत्रण, जखमींवर उपचार आणि पीडितांना नुकसान भरपाई यासंबंधीच्या बाबींचीही तपासणी केली जाईल. ही समिती पोलीस, निमलष्करी दल आणि इतर सुरक्षा कर्मचाऱ्यांकडून आंदोलकांवर झालेल्या बळाच्या वापराच्या आरोपांची चौकशी करेल.

दरम्यान, दिल्ली पोलिसांनी १८ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, २० जुलै रोजीचा संसद मोर्चा बेकायदेशीर होता आणि त्यासाठी कोणतीही परवानगी नव्हती. जंतर मंतर येथील आंदोलनात अनेक सराईत गुन्हेगारांनीही सहभाग घेतला होता. पोलिसांनी सांगितले की, संसद मोर्चादरम्यान आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडले आणि पोलिसांवर हल्ला करून शांततापूर्ण आंदोलनात अडथळा आणला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बळाचा वापर करण्यात आला, परंतु आंदोलकांवर कोणत्याही अतिरिक्त बळाचा वापर केला गेला नाही. पोलिसांच्या अत्याचारांची न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांना उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात पोलीस उपआयुक्त सचिन शर्मा यांनी ही माहिती दिली.




जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि राजकीय पक्षांची भूमिका

आजचा तरुण केवळ उद्याचा मतदार नाही, तर आजच्या लोकशाहीचा सक्रिय भाग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनांकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे ही लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती ठरू शकते. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रश्नांसाठी आवाज उठवणे, सरकारला जाब विचारणे आणि व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हा त्यांचा अधिकार आहे. मात्र त्याच वेळी या आंदोलनांना राजकीय पक्षांच्या स्वार्थाचे साधन होऊ न देणे, ही विद्यार्थ्यांचीही जबाबदारी आहे. मुंबईत ६ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी जनरेशन झेडच्या आंदोलनाबाबत केलेले विधान याच संदर्भात महत्त्वाचे ठरते. आंदोलन करणारे तरुण 'देशविरोधी' नसून ते आपलेच लोक आणि देशाची पुढची पिढी आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. तरुणांच्या तक्रारी आणि असंतोष वास्तविक असल्याचेही त्यांनी मान्य केले. विद्यार्थी आंदोलनांकडे संशयाने पाहण्याच्या वातावरणात ही भूमिका निश्चितच विचार करण्यास भाग पाडणारी आहे. यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे आरएसएसचे पदाधिकारी अतुल लिमये यांनी आंदोलनाबाबत अधिक संशय व्यक्त केला होता. आंदोलनाच्या व्यासपीठावर देशविरोधी घोषणा झाल्याचा आरोप त्यांनी केला होता. या दोन भूमिकांमधील फरक महत्त्वाचा आहे. एक भूमिका 'या आंदोलनामागे कोण आहे?' हा प्रश्न विचारते, तर दुसरी भूमिका 'तरुण आंदोलन का करीत आहेत?' हा मूलभूत प्रश्न उपस्थित करते. लोकशाहीच्या दृष्टीने दुसरा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या असंतोषामागे केवळ एखादी परीक्षा किंवा भरतीचा प्रश्न नाही. स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकार, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील अनिश्चितता, बेरोजगारी, वाढती स्पर्धा, महागडे शिक्षण आणि भवितव्याबाबतची असुरक्षितता या अनेक प्रश्नांचा त्यामागे समावेश आहे. एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या परीक्षेसाठी अनेक वर्षे मेहनत घेतलेली असते. कुटुंबाने मोठा आर्थिक खर्च केलेला असतो. त्या परीक्षेतील गैरप्रकारामुळे केवळ एका परीक्षेचा निकाल बदलत नाही; तर त्या तरुणाचा व्यवस्थेवरील विश्वासही डळमळतो. याच परिस्थितीचा गैरफायदा घेऊन राजकीय लोक विद्यार्थ्यांना चिथावणी देतात व आपली पोळी भाजून घेतात हे स्पष्ट झाले आहे. कॉक्रोच जनता पार्टी सोबतच आता 'दिमागी नक्षली पार्टी' पुढे येते आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भाषणातून शब्द घेऊन या पार्टीचा रातोरात उदय झाला आहे. ही सवंग प्रसिद्धी आणि मोफत मिळणारा पैसा यासाठी तर केले जात नाही ना, याचाही विचार केला गेला पाहिजे. तरी विद्यार्थ्यांचा संताप समजून घेण्याची गरज आहे. त्यांना विश्वासार्ह परीक्षा हव्या आहेत, पारदर्शक भरती प्रक्रिया हवी आहे, गुणवत्तेला न्याय देणाऱ्या संस्था हव्या आहेत, निष्पक्ष प्रशासन हवे आहे आणि प्रश्न विचारण्याचा अधिकार अबाधित हवा आहे. पोलिसी बळाचा वापर करून आंदोलन दडपता येईल; परंतु त्यामागील प्रश्न संपवता येणार नाहीत. दुर्दैवाने, विद्यार्थी आंदोलनांमध्येही राजकीय हस्तक्षेप होतो आहे. सत्ताधारी पक्ष विरोधकांवर आरोप करतात आणि विरोधक सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करतात. आंदोलनकर्त्यांवरील कारवाईपासून हिंसाचारापर्यंत प्रत्येक घटनेचे राजकीय व चुकीचे अर्थ लावले जातात. परिणामी मूळ प्रश्न बाजूला पडतो आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप केंद्रस्थानी येतात. संसद ठप्प होणे हे त्याचेच एक उदाहरण आहे. आपल्या देशाच्या राजकारणाने तरुणांना जात, धर्म, प्रदेश आणि विचारसरणीच्या आधारावर संघटित करण्याची कला आत्मसात केली आहे. मंडल आयोगाच्या राजकारणाने एक ओळख पुढे आणली, मंदिराच्या राजकारणाने दुसरी ओळख मजबूत केली. परंतु आजच्या तरुणांसमोर प्रश्न वेगळे आहेत. तो विद्यार्थी हिंदू आहे की मुस्लिम, ब्राह्मण आहे की दलित, उत्तर भारतीय आहे की दक्षिण भारतीय यापेक्षा तो कोणत्या परीक्षेला आणि संकटाला सामोरा जात आहे, त्याला नोकरी मिळणार आहे का, त्याच्या कष्टाला न्याय मिळणार आहे का आणि संस्थांवर विश्वास ठेवता येणार आहे का, हे प्रश्न त्याच्यासाठी अधिक महत्त्वाचे होत आहेत. यातून देशव्यापी तरुणांची नवी राजकीय शक्ती उभी राहू शकते. ती कोणत्याही एका पक्षाची मक्तेदारी असणार नाही. अशा शक्तीसमोर सत्ताधारी पक्षाप्रमाणेच विरोधकांनाही उत्तरदायी राहण्याचे आव्हान असेल. सरकारकडून पारदर्शकतेची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी विरोधी पक्षांकडूनही तितकीच पारदर्शकता आणि जबाबदारी मागितली पाहिजे, अन्यथा अशा मागणीमध्ये त्यांचा काहीतरी स्वार्थ आहे हे उघड होईल. विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, त्यांचा राग हा कोणत्याही राजकीय पक्षाची मालमत्ता नाही. आंदोलन हे लोकशाहीचे प्रभावी साधन आहे; परंतु ते द्वेष, हिंसा, अफवा आणि धार्मिक किंवा जातीय विभाजनाचे माध्यम बनता कामा नये. प्रश्नांवर आधारित, पुराव्यांवर उभे आणि शांततामय आंदोलनच दीर्घकाळ समाजाला दिशा देऊ शकते. परंतु दुर्दैवाने सध्याच्या परिस्थितीमध्ये, समस्या सर्वांना सारख्याच असल्या तरीही जातनिहाय आंदोलन होत आहेत. यामागे देखील राजकीय पक्षांचा हात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच आजच्या तरुणांनी राजकीय पक्षांचे 'पोपट' होण्याऐवजी जागरूक नागरिक होण्याची गरज आहे. आंदोलनातून धोरणाकडे, संतापातून संघटनेकडे, घोषणांमधून कृतीकडे आणि असंतोषातून जबाबदार नागरिकत्वाकडे वाटचाल झाली पाहिजे.

# ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी



२१ ऑगस्ट रोजी 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' साजरा केला जातो. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनातील प्रश्न, त्यांच्या गरजा, समाजातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने या दिवसाला विशेष महत्त्व आहे. हा दिवस केवळ ज्येष्ठांचा गौरव करण्याचा किंवा त्यांना शुभेच्छा देण्याचा दिवस नसून, वृद्धत्वाकडे समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचा प्रत्यक्ष लाभ मिळतो का आणि त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक सामाजिक वातावरण उपलब्ध आहे का, याचा विचार करण्याची संधी आहे. आयुष्यभर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या उभारणीत योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना वृद्धावस्थेत सुरक्षितता, आरोग्य, आर्थिक आधार, कौटुंबिक आपुलकी आणि सामाजिक सन्मान मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजावरील ओझे नसून अनुभव, ज्ञान, संस्कार आणि सामाजिक स्मृतीची अमूल्य संपत्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे दयेच्या नव्हे, तर मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि नागरिकांच्या प्रतिष्ठेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

वृद्धत्व हा मानवी जीवनाचा स्वाभाविक टप्पा आहे. बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वृद्धत्व या जीवनप्रवासातील नैसर्गिक अवस्था आहेत. वय वाढले म्हणून व्यक्तीची मानवी प्रतिष्ठा, नागरिकत्व किंवा मूलभूत अधिकार कमी होत नाहीत. शरीराची कार्यक्षमता काही प्रमाणात कमी होऊ शकते; परंतु जीवनानुभव, ज्ञान, कौशल्य, विवेक आणि सामाजिक भान यांचे मूल्य कमी होत नाही. उलट अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे अनेक दशकांचा अनुभव असतो. कुटुंब, शेती, शिक्षण, उद्योग, प्रशासन, साहित्य, कला, सामाजिक कार्य आणि सार्वजनिक जीवन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान समाजाच्या जडणघडणीचा महत्त्वाचा भाग आहे. म्हणून वृद्धत्वाला दुर्बलतेचे प्रतीक मानण्याऐवजी अनुभव आणि ज्ञानाच्या समृद्धीचा टप्पा म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ व्यक्तींना आदर देण्याची दीर्घ परंपरा आहे. संयुक्त कुटुंबव्यवस्थेत आजी-आजोबा आणि कुटुंबातील इतर ज्येष्ठ व्यक्ती हे घरातील अनुभवाचे आणि संस्कारांचे केंद्र असत. मुलांच्या संगोपनात त्यांचा सहभाग असे. लोककथा, इतिहास, परंपरा, संस्कृती, जीवनमूल्ये, स्थानिक ज्ञान आणि कुटुंबाचा इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ज्येष्ठ करत असत. मात्र बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे संयुक्त कुटुंबव्यवस्था कमी झाली. रोजगार आणि शिक्षणासाठी तरुणांचे स्थलांतर वाढले. शहरीकरण आणि व्यक्तिकेंद्रित जीवनशैलीमुळे कुटुंबातील परस्पर संवादाचे स्वरूप बदलले. परिणामी अनेक ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात, तर काही जण कुटुंबासोबत असूनही भावनिक एकाकीपणाचा अनुभव घेतात. या बदलत्या परिस्थितीत ज्येष्ठांच्या हक्कांचे संरक्षण अधिक महत्त्वाचे ठरते.

ज्येष्ठ नागरिकांचा सर्वांत मूलभूत अधिकार म्हणजे सन्मानाने जगण्याचा अधिकार होय. वय वाढले म्हणून एखाद्या व्यक्तीचे मत, अनुभव किंवा निर्णयक्षमता संपत नाही. घरातील निर्णयांमध्ये ज्येष्ठांचा सहभाग असणे, त्यांच्या मतांचा आदर करणे आणि त्यांच्या भावना समजून घेणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ व्यक्तीलाही स्वतःचा स्वाभिमान असतो. तिच्या प्रत्येक गरजेकडे उपकार म्हणून पाहणे चुकीचे आहे. 'आता तुमचे वय झाले आहे', 'तुम्हाला काही समजत नाही' किंवा 'तुम्ही आमच्यावर अवलंबून आहात' अशा मानसिकतेतून ज्येष्ठांना कमी लेखणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आघात करणारे आहे. ज्येष्ठांची सेवा ही उपकाराची नव्हे, तर कृतज्ञतेची आणि सामाजिक जबाबदारीची भावना असली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांमध्ये सुरक्षिततेचा अधिकार अत्यंत महत्त्वाचा आहे. वृद्ध व्यक्तींना शारीरिक हिंसा, मानसिक छळ, दुर्लक्ष, आर्थिक शोषण, फसवणूक आणि मालमत्तेवर बेकायदेशीर दबाव यांपासून संरक्षण मिळाले पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांवरील अत्याचार अनेकदा घराच्या चार भिंतींच्या आत घडतात. कौटुंबिक प्रतिष्ठा, नातेसंबंध आणि समाजाच्या प्रतिक्रियेच्या भीतीमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. काही वेळा अत्याचार करणारी व्यक्तीच त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणारी असल्यामुळे ज्येष्ठांना विरोध करणे कठीण जाते. त्यामुळे त्यांना विश्वासार्ह तक्रार निवारण व्यवस्था, कायदेशीर मार्गदर्शन आणि सामाजिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी अन्याय सहन करणे ही संस्कृती बदलली पाहिजे.

आर्थिक सुरक्षितता हा ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचा महत्त्वाचा आधार आहे. संघटित क्षेत्रातील काही व्यक्तींना निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन किंवा इतर आर्थिक साधनांचा आधार मिळतो; परंतु असंघटित क्षेत्रातील अनेक कामगार वृद्धावस्थेत नियमित उत्पन्नाविना राहतात. शेतमजूर, लघु शेतकरी, घरगुती कामगार, कारागीर, छोटे व्यावसायिक आणि इतर असंघटित कामगारांनी आयुष्यभर कष्ट केलेले असतात; परंतु वृद्धापकाळासाठी पुरेशी आर्थिक तरतूद झालेली असेलच असे नाही. महागाई, औषधोपचाराचा खर्च आणि दैनंदिन गरजा यामुळे त्यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. म्हणून वृद्धापकाळातील सामाजिक सुरक्षा, निवृत्तीवेतन, आरोग्यसुरक्षा आणि विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे.

आरोग्याचा अधिकार हा ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला आहे. वाढत्या वयाबरोबर नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार, तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, आपत्कालीन उपचार आणि पुनर्वसनाच्या सुविधांची आवश्यकता वाढते. ग्रामीण भागातील ज्येष्ठांना आरोग्यसेवा मिळविण्यासाठी लांब अंतर पार करावे लागणे, वाहतुकीचा अभाव किंवा उपचाराचा खर्च परवडत नसणे अशा अडचणी येऊ शकतात. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि जिल्हास्तरीय आरोग्यसेवा यंत्रणेत ज्येष्ठ नागरिकांच्या गरजांचा विशेष विचार केला पाहिजे. आरोग्यसेवा ही दया नसून सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत गरज आहे. ज्येष्ठ नागरिकांना उपचार घेताना सन्मानजनक वर्तन आणि योग्य माहिती मिळणेही तितकेच आवश्यक आहे.

शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक आरोग्यालाही समान महत्त्व दिले पाहिजे. निवृत्तीनंतर दैनंदिन जीवनातील भूमिका बदलतात. मुलांचे स्थलांतर, जोडीदाराचे निधन, मित्रपरिवार कमी होणे, सामाजिक सहभाग घटणे आणि एकाकीपणा यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. काही ज्येष्ठ नागरिकांना आपले जीवन निरर्थक झाल्याची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी कुटुंबीयांनी त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या भावना ऐकून घेणे, त्यांना घरातील निर्णयांमध्ये सहभागी करणे आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. मानसिक आरोग्याचा अधिकार म्हणजे उपचार मिळण्यापुरता मर्यादित नसून प्रेम, आपलेपणा, भावनिक आधार आणि सन्मानाचे वातावरण मिळण्याचा अधिकारही आहे.

ज्येष्ठ महिलांच्या हक्कांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. आयुष्यभर घर आणि कुटुंबाची जबाबदारी पार पाडलेल्या अनेक महिलांकडे स्वतःच्या नावावर पुरेशी आर्थिक साधने नसतात. पतीच्या निधनानंतर त्यांची आर्थिक आणि सामाजिक असुरक्षितता वाढू शकते. ग्रामीण भागातील वृद्ध महिलांना आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा, निवास, आर्थिक सहाय्य आणि कायदेशीर माहिती मिळविताना अधिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ज्येष्ठ महिलांना त्यांच्या मालमत्ता हक्कांची, आर्थिक योजनांची, आरोग्यविषयक सुविधांची आणि कायदेशीर संरक्षणाची माहिती देणे आवश्यक आहे. वृद्ध महिला ही केवळ कुटुंबाची सेवा करणारी व्यक्ती नसून स्वतंत्र अधिकार असलेली नागरिक आहे, ही जाणीव समाजात दृढ झाली पाहिजे.

ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सहभागाचा अधिकार मिळणेही आवश्यक आहे. वृद्धत्व म्हणजे समाजातून निवृत्ती नव्हे. अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे समाजासाठी देण्यासारखे ज्ञान, कौशल्य आणि अनुभव असतो. निवृत्त शिक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात. अनुभवी शेतकरी पारंपरिक कृषिज्ञान पुढील पिढीला देऊ शकतात. कारागीर कौशल्याचे प्रशिक्षण देऊ शकतात. विविध क्षेत्रांत काम केलेले ज्येष्ठ तरुणांना व्यावसायिक आणि जीवनविषयक मार्गदर्शन देऊ शकतात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी ज्येष्ठांच्या अनुभवाचा समाजहितासाठी उपयोग करून घेण्यासाठी संधी निर्माण केल्या पाहिजेत. ज्येष्ठांचा अनुभव आणि तरुणांची ऊर्जा यांचा संगम सामाजिक विकासासाठी अत्यंत परिणामकारक ठरू शकतो.

ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केवळ शासनाची नाही. कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटना, माध्यमे आणि स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे. कुटुंबाने प्रेम, आपुलकी आणि सुरक्षितता द्यावी. समाजाने ज्येष्ठांना सक्रिय सहभागाच्या संधी द्याव्यात. शासनाने कायदे आणि कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवाव्यात. स्वयंसेवी संस्थांनी हक्कांविषयी कायदेशीर आणि सामाजिक जनजागृती करावी. माध्यमांनी ज्येष्ठांच्या समस्यांकडे केवळ भावनिक दृष्टिकोनातून न पाहता अधिकार आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहावे. ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांवर सार्वजनिक चर्चा वाढली तर त्यांच्या समस्यांकडे धोरणात्मक पातळीवर अधिक गांभीर्याने पाहिले जाईल.

२१ ऑगस्टचा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन हा केवळ ज्येष्ठांना शुभेच्छा देण्याचा किंवा त्यांचा सत्कार करण्याचा दिवस न राहता त्यांच्या हक्कांविषयी आत्मपरीक्षण करण्याचा दिवस ठरला पाहिजे. ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित राहण्याचा, आरोग्यसेवा मिळविण्याचा, आर्थिक आधाराचा, मालमत्तेचे संरक्षण करण्याचा, सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा, निर्णयप्रक्रियेत आपले मत मांडण्याचा आणि प्रेम व आपुलकी मिळविण्याचा अधिकार आहे. त्यांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज आहे; उपकारांची नव्हे, तर अधिकारांच्या हमीची गरज आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण ही केवळ कायदेशीर जबाबदारी नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही मूल्यांची खरी कसोटी आहे. ज्येष्ठांच्या अनुभवाला योग्य स्थान, त्यांच्या जीवनाला सुरक्षितता आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला स्वाभिमान मिळाला, तरच समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत म्हणता येईल. म्हणूनच 'ज्येष्ठ नागरिकांचे हक्क' हा एका दिवसापुरता विषय न राहता प्रत्येक कुटुंबाच्या संस्कारांचा, प्रत्येक संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा आणि प्रत्येक नागरिकाच्या मानवी कर्तव्याचा अविभाज्य भाग झाला पाहिजे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
हिंगोली

# पाणी, माती आणि शेतीचे उद्याचे भविष्य

पाऊस पडतो तेव्हा आपण पाण्याकडे पाहतो; पण शेतीचे भविष्य पाहताना मातीचा विचार करणे तितकेच आवश्यक असते. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब शेवटी जमिनीवरच उतरतो आणि त्यानंतर त्याचा प्रवास कसा होतो-तो वाहून जातो, जमिनीत मुरतो, ओलावा बनतो की पिकाच्या जीवनाचा आधार ठरतो यावर शेतीची दिशा ठरते. म्हणून पाण्याचा प्रश्न हा केवळ पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न नाही; तो मातीच्या आरोग्याचा, शेतीच्या स्थैर्याचा आणि भविष्यातील अन्नसुरक्षेचा प्रश्न आहे. २१ ऑगस्टच्या जलसंधारण दिनाच्या निमित्ताने राज्यभर होत असलेली जनजागृती या व्यापक विचाराला चालना देणारी ठरावी. पाणी जपताना माती जपणे आणि माती जपताना शेतीचे भविष्य सुरक्षित करणे, हीच या निमित्ताने अधोरेखित होणारी दिशा असायला हवी.

शेती आणि पाणी यांचे नाते अतूट आहे. पाऊस किती पडला, यापेक्षा त्यातील किती पाणी जमिनीने स्वीकारले आणि किती काळ शेतीच्या उपयोगात राहिले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. पावसाचे पाणी वेगाने वाहून गेले तर ते डोळ्यांसमोर उपलब्ध असूनही शेतीसाठी दीर्घकाळाचा आधार बनत नाही. याउलट ते जमिनीत मुरले, जमिनीतील ओलावा टिकला आणि पिकाच्या गरजेनुसार त्याचा उपयोग झाला, तर त्याच पावसाचे रूपांतर उत्पादनात होते. त्यामुळे जलसंधारणाचा खरा अर्थ केवळ पाणी साठविण्यात नसून पाण्याला शेतीच्या उत्पादनक्षम प्रक्रियेत टिकवून ठेवण्यात आहे.

२१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिनाच्या निमित्ताने राज्यभर विविध जनजागृती उपक्रम होत आहेत. पाण्याच्या महत्त्वाबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे, मृद व जलसंधारणाचा विचार लोकसहभागाशी जोडणे आणि पाण्याच्या विवेकी वापराबाबत जागरूकता वाढविणे हा या उपक्रमांचा व्यापक हेतू आहे. 'वॉक फॉर वॉटर'सारख्या उपक्रमातून पाण्याचा प्रश्न समाजाच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आणला जात आहे. अशा उपक्रमांचे महत्त्व केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता त्यातून निर्माण होणारी जाणीव शेती, घर, गाव आणि दैनंदिन जीवनातील व्यवहारात उतरली तर त्याचे खरे मूल्य जाणवेल. पाण्याचा विचार केला की मातीचा विचार अपरिहार्य ठरतो. माती ही केवळ पिके उगविण्याचे माध्यम नाही. ती पाणी साठवते, पिकांना अन्नद्रव्ये उपलब्ध करून देते आणि विविध सूक्ष्मजीवांच्या जीवनाला आधार देते. मातीची रचना, सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण, जलधारण क्षमता आणि जैविक सक्रियता यांचा पिकाच्या वाढीवर परिणाम होतो. निरोगी माती पावसाच्या पाण्याला अधिक



चांगल्या प्रकारे स्वीकारते आणि त्यातील काही भाग अधिक काळ आपल्या पोटात धरून ठेवते. त्यामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा शेतीला होणारा लाभ मातीच्या आरोग्याशी जोडलेला आहे.

मृदा संवर्धनाचा विचार म्हणूनच जलसंधारणाइतकाच महत्त्वाचा आहे. पावसाचे पाणी वेगाने वाहताना जमिनीचा वरचा सुपीक थर सोबत घेऊन जाऊ शकते. त्या मातीबरोबर सेंद्रिय पदार्थ आणि अन्नद्रव्यांचेही नुकसान होऊ शकते. परिणामी जमिनीची उत्पादकता टिकवण्यासाठी अधिक प्रयत्न करावे लागू शकतात. म्हणून पाणी जमिनीत मुरविण्याबरोबरच मातीची धूप कमी करणे, तिची रचना टिकविणे आणि सेंद्रिय पदार्थांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. मातीचा प्रत्येक कण हा शेतीच्या भविष्यातील भांडवलाचा एक भाग आहे.

बदलत्या हवामानामुळे पाणी आणि मातीच्या या नात्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पावसाच्या स्वरूपातील बदल, पावसातील खंड, कमी कालावधीत होणारा जोरदार पाऊस आणि वाढते तापमान यांचा शेतीवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत पाण्याचे नियोजन अधिक सूक्ष्म पातळीवर करावे लागेल. पाऊस आला की त्याचे स्वागत करण्याबरोबरच तो शेतात किती काळ टिकेल, याचाही विचार करावा लागेल.

हवामानातील अनिश्चिततेला सामोरे जाण्यासाठी जमिनीतील ओलावा टिकविण्याची क्षमता वाढविणे ही शेतीसाठी महत्त्वाची नैसर्गिक ढाल ठरू शकते. या पार्श्वभूमीवर पीक नियोजनाकडेही नव्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. उपलब्ध पाणी, मातीचा प्रकार, स्थानिक हवामान आणि पिकाची गरज यांचा समतोल साधून पिकांची निवड केली तर उपलब्ध संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर करता येतो. पीक विविधीकरण, स्थानिक परिस्थितीला अनुरूप वाणांची निवड आणि पाण्याच्या उपलब्धतेशी सुसंगत पीकपद्धती यामुळे शेती अधिक लवचिक बनू शकते. भविष्यातील शेतीत केवळ उत्पादनाची कमाल मर्यादा गाठण्यापेक्षा उपलब्ध संसाधनांमध्ये उत्पादनातील स्थैर्य राखणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

भूजल हा या संपूर्ण व्यवस्थेतील आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. जमिनीखालील पाणी हा सहज उपलब्ध होणारा आणि अमर्याद स्रोत नाही. पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या प्रक्रियेला वेळ लागतो. त्यामुळे पावसाच्या काळात भूजल पुनर्भरणाला चालना देणे आणि उपलब्ध भूजलाचा विवेकी वापर करणे या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. पाणी जमिनीत मुरविणे आणि ते गरजेपुरते वापरणे या दोन गोष्टी एकत्र आल्या तरच जलसुरक्षित शेतीचा पाया मजबूत होईल. पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदतही घेता येते. मृदा परीक्षण, हवामानविषयक माहिती, अचूक सिंचन, रिमोट सेन्सिंग, भौगोलिक माहिती प्रणाली, सेन्सर तंत्रज्ञान आणि अचूक शेती यांमुळे पाणी आणि निविष्ठांचे अधिक योग्य नियोजन शक्य होते. मात्र तंत्रज्ञानाचा उपयोग स्थानिक गरजांशी जोडला गेला तरच त्याची परिणामकारकता वाढते. आधुनिक विज्ञानासोबत शेतकऱ्याचे अनुभवाधारित ज्ञान आणि स्थानिक परिस्थितीची जाण यांची सांगड घातली तर शेतीसाठी अधिक व्यवहार्य उपाय निर्माण होऊ शकतात.

पाण्याचे संवर्धन हे पर्यावरणाशी संबंधित असले तरी त्याचा थेट संबंध शेतीच्या अर्थकारणाशी आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर झाल्यास उत्पादनातील जोखीम कमी करण्यास मदत होऊ शकते. जमिनीचे आरोग्य चांगले राहिल्यास पिकांची उत्पादकता आणि स्थैर्य टिकविण्यास मदत होते. त्यामुळे मृद व जलसंधारणाकडे केवळ नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण म्हणून न पाहता शेतीच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याचा आधार म्हणूनही पाहण्याची गरज आहे. या प्रयत्नांमध्ये लोकसहभागाला विशेष महत्त्व आहे. पाण्याचा प्रवाह शेताच्या बांधावर थांबत नाही आणि पाणलोट क्षेत्राची प्रक्रिया एका शेतापुरती मर्यादित नसते. एका भागातील पाण्याचे व्यवस्थापन दुसऱ्या भागातील शेतीवर परिणाम करू शकते. म्हणून गावपातळीवर सामूहिक नियोजन, स्थानिक पाणलोट क्षेत्राचा विचार आणि उपलब्ध संसाधनांचा विवेकी वापर यांना महत्त्व दिले पाहिजे. शेतकरी, नागरिक, विद्यार्थी, स्थानिक संस्था, कृषी तज्ज्ञ आणि संशोधन क्षेत्र यांचा समन्वय या कामाला अधिक व्यापक आधार देऊ शकतो.

पाणी आणि मातीचे संवर्धन ही पुढील पिढीशी संबंधित जबाबदारी आहे. आज आपण जमिनीत किती ओलावा ठेवतो, मातीचे आरोग्य कसे जपतो आणि पाण्याचा वापर किती विवेकाने करतो, यावर उद्याच्या शेतीची गुणवत्ता ठरणार आहे. त्यामुळे जलसंधारणाची जाणीव केवळ टंचाईच्या काळात निर्माण होऊन उपयोग नाही. पाणी उपलब्ध असतानाच त्याचे मूल्य ओळखणे आणि संवर्धनाची सवय अंगीकारणे अधिक आवश्यक आहे. २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन या दृष्टीने केवळ एक स्मरणदिन न राहता संवर्धनाच्या व्यापक विचाराचा प्रारंभबिंदू ठरू शकतो. राज्यभर पाण्यासाठी पडणारी पावले शेताच्या बांधापर्यंत पोहोचली, तरच त्यांचे महत्त्व अधिक वाढेल. पावसाचे पाणी अडविणे, ते जमिनीत मुरविणे, मातीची धूप कमी करणे, जमिनीतील ओलावा टिकविणे, उपलब्ध पाण्यानुसार पीक नियोजन करणे आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे या कृतींमध्ये जलसंधारण दिनाची खरी फलश्रुती दिसेल.

शेतीचे उद्याचे भविष्य केवळ अधिक उत्पादनात नाही; ते निरोगी माती, उपलब्ध पाणी, योग्य पीक नियोजन आणि शेतकऱ्याच्या आर्थिक स्थैर्यात आहे. बदलत्या हवामानाच्या काळात शेती अधिक लवचिक आणि संसाधनक्षम बनविण्यासाठी पाणी आणि माती या दोन्ही नैसर्गिक संपत्तींकडे एकात्मिक दृष्टीने पाहावे लागेल. विज्ञान, स्थानिक ज्ञान आणि सामूहिक प्रयत्न यांच्या आधारावर शेतीची ही नवी वाट अधिक सक्षमपणे तयार करता येऊ शकते. पावसाचा थेंब आकाशातून पडतो; पण त्याचे खरे मूल्य जमिनीवर ठरते. तो वाहून गेला तर क्षणिक पाऊस; जमिनीत मुरला तर भविष्यातील पाणीसाठा; पिकाने वापरला तर अन्न; आणि शेतकऱ्याच्या उत्पन्नात रूपांतरित झाला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार. म्हणून पाण्याच्या प्रत्येक थेंबात केवळ पाणी नसते-त्यात शेतीचे उद्याचे भविष्य दडलेले असते. पाणी जपणे म्हणजे केवळ आजची गरज भागविणे नव्हे; उद्याची शेती सक्षम करणे होय. माती जपणे म्हणजे केवळ जमीन टिकविणे नव्हे; पुढील पिढीची अन्नसुरक्षा जपणे होय. जलसंधारणाची खरी सुरुवात पावसाच्या थेंबापासून होते; पण तिचे अंतिम ध्येय निरोगी माती, सक्षम शेती आणि सुरक्षित भविष्य हेच असले पाहिजे.

**-डॉ. भागवत चव्हाण,**
(लेखक कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ८७ ६७ ४५६ ४५५

# अन्नदाता शेतकऱ्यांच्या व्यथा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण रोज जे अन्न खातो, ते शेतकऱ्याच्या कष्टातून आपल्या घरापर्यंत पोहोचते. म्हणूनच शेतकऱ्याचे जीवन आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचे आहे. देशातील जनतेला अन्नधान्य पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य शेतकरी करतो. म्हणूनच शेतकऱ्याला 'अन्नदाता' असे म्हटले जाते. शेतकऱ्यांची दिनचर्या पहाटेपासून सुरू होते. जनावरांची स्वच्छता, दूध काढणे व गोठा साफ करणे ही कामे नंतर शेतात नांगरणी, पेरणी, मशागत, पिकांची निगा, पाणी देणे, खते घालणे, तण काढणे आणि कापणी अशी अनेक कामे मेहनतीने करतात. उन्हाळा, पाऊस किंवा थंडी यांची पर्वा न करता तो सतत कष्ट करत असतो.

शेतकऱ्यांचे जीवन कष्टमय आणि आव्हानात्मक आहे. पाऊस वेळेवर पडला नाही, अतिवृष्टी झाली किंवा दुष्काळ पडला तर त्याच्या पिकांचे नुकसान होते. कधी रोगराई किंवा बाजारभावातील चढ-उतारामुळे ही त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. तरीही तो निराश न होता पुन्हा नव्या जोमाने शेतीची कामे सुरू करतो. आधुनिक काळात शेतीमध्ये यंत्रांचा, सुधारित बियाण्यांचा आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे श्रम काही प्रमाणात कमी झाले असले, तरी त्याचे कष्ट आणि जबाबदारी कायम आहेत. शेतकऱ्याच्या मेहनतीमुळेच आपल्या ताटात अन्न येते.

गहू,ज्वारी, डाळी, भाज्या आणि इतर पिके यामध्ये शेतकऱ्याचे अपार कष्ट असतात. त्यामुळे अन्नाची नासाडी न करणे आणि शेतकऱ्याच्या मेहनतीचा आदर करणे ही आपली जबाबदारी आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी त्यांना योग्य बाजारभाव, आधुनिक शेतीचे ज्ञान, सिंचनाच्या सुविधा आणि आवश्यक साधने मिळणे गरजेचे आहे. सरकारबरोबरच समाजानेही शेतकऱ्यांना योग्य सन्मान आणि सहकार्य दिले पाहिजे. म्हणूनच आपण नेहमी शेतकऱ्याच्या कष्टांचा आदर आणि त्याच्या योगदानाबद्दल कृतज्ञ राहिले पाहिजे.

शेतकरी हा देशाच्या प्रगतीचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्याचे जीवन साधे असले तरी त्याच्या श्रमांना मोठे महत्त्व आहे. अनेक संकटांवर मात करून तो समाजाचे अन्नधान्याचे गरज भागवतो. शेतकरी स्वतः कष्ट करून धान्य, भाजीपाला, फळे आणि इतर पिके पिकवतो. त्याच्या मेहनतीमुळे आपल्या घरातील अन्नाची गरज पूर्ण होते. त्यामुळे शेतकऱ्याच्या कष्टांचा आदर करणे आणि त्यानां योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. भारतीय शेतकऱ्याच्या कष्टांचा आणि श्रमांचा आपण सदैव आदर केला पाहिजे. योग्य बाजारभाव, आधुनिक साधने आणि आवश्यक सुविधा मिळाल्यास शेती अधिक समृद्ध होईल. शेतकरी सुखी आणि समृद्ध झाला, तर देशही अधिक सक्षम आणि समृद्ध होईल. शेतकऱ्याच्या कष्टाला सलाम करून त्याच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी हातभार लावला पाहिजे.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# समृद्धी महामार्गासाठी जुने भूसंपादन अवार्ड रद्द करून फेरमूल्यांकन करा

## नांदेडच्या बाधित शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जालना-नांदेड समृद्धी महामार्गातील नांदेड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांनी जुने भूसंपादन अवार्ड रद्द करून उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार फेरमूल्यांकन करण्याची मागणी जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एकतर्फी भूसंपादन कायदा वगळून करण्यात आलेले निवाडे त्यांना मान्य नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ८२९६/२०२३ वरील २४ डिसेंबर २०२५ च्या निर्णयानुसार रद्द ठरवलेले अवार्ड रद्द करून फेर प्रक्रिया करून मावेजा द्यावा.



शासनाच्या २४ जानेवारी २०२३ व २१ जानेवारी २०२६ च्या परिपत्रकानुसार मूल्यांकन करावे. तसेच भूसंपादन कायदा २०१३ नुसार पुनर्वसन व पुनर्वसाहतचा लाभ द्यावा. शेतातील विहीर, बोअरवेल, पाईपलाईन पाहून बागायत व हंगामी बागायत दर निश्चित करावेत. कोरोना काळात पिकपेरा नोंद झाली नसल्याने ती अट रद्द करावी.

याशिवाय २० फेब्रुवारी २०१६ चा शासन निर्णय शेतकऱ्यांना लागू करावा. नोव्हेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०२१ मधील उच्चतम खरेदीखत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार ग्राह्य धरावे. महामार्गाच्या दोन्ही बाजूने सर्विस रोड देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

बाधित शेतकऱ्यांनी विकासाला विरोध नसल्याचे सांगत कायदेशीर व रास्त मावेजा मिळेपर्यंत लढा सुरू राहील असे स्पष्ट केले. आंदोलनात शेतकरी नेते संतोष गव्हाणे, दीपक मगर, कुलदीप राक्षसमारे, विनय मोरे, राज अटकोरे, के. एच. वने, प्रल्हाद इंगोले, सतीश ढगे यांच्यासह पिंपळगाव कोरका व नाळेश्वर येथील बाधित शेतकरी सहभागी झाले होते.

# उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय व ग्रंथमित्र पुरस्कारासाठी २५ सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाच्यावतीने सन २०२५-२६ या वर्षासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार तसेच डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येणार आहेत.

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, नागरिकांना अधिक चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने हे पुरस्कार देण्यात येतात. ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवकांचा गौरव करण्यासाठी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क व ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख, ७५ हजार, ५० हजार आणि २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच राज्यस्तरावर एक व महसुली विभागातील प्रत्येकी एक असा उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता आणि एक उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार व २५ हजार रुपये रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

सन २०२५-२६ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुकांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत तीन प्रतींत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

# पीपल्समध्ये नशामुक्त भारत अभियान आणि शिष्यवृत्ती योजनांबाबत एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया, भारत सरकार शिष्यवृत्ती २.० योजना तसेच नशामुक्त भारत अभियानाच्या प्रचार व प्रसिद्धीबाबत एकदिवसीय कार्यशाळा पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथे उत्साहात पार पडली.



कार्यशाळेची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली. त्यानंतर नशामुक्त भारत अभियानांतर्गत उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. कार्यशाळेत सहायक आयुक्त समाज कल्याण नांदेड शिवानंद मिनगिरे, समाज कल्याण अधिकारी गजानन नरवाडे, पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, कार्यालय अधीक्षक रोहिदास आडे, ग्रंथपाल संदीप गायकवाड, शिष्यवृत्ती विभागाचे विजय तारू यांच्यासह विविध महाविद्यालयांतील कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवानंद मिनगिरे यांनी नशामुक्त भारत अभियानाबाबत मार्गदर्शन करताना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

पुढे बोलताना मिनगीरे यांनी शिष्यवृत्ती अर्जातील त्रुटी कशा राहतात व यासाठी विद्यार्थ्यांनी आपले अर्ज स्वतः जागरूक राहून भरले पाहिजे असे सांगितले. यानंतर यावेळी संदीप गायकवाड आणि प्राचार्य विकास सुकाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. समाजकल्याण अधिकारी गजानन नरवाडे यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती आणि स्वाधार योजनेची सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये कैलास गायकवाड यांनी त्यांच्या स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या व्यसनमुक्तीच्या उपक्रमांची माहिती दिली. नशामुक्त भारत अभियानाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विठ्ठल बोराटे आणि गणेश माळवतकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे भारत सरकार शिष्यवृत्ती २.० योजनेची सविस्तर माहिती दिली.

श्रीमती अंजली नरवाडे यांनी स्वाधार योजनेसाठी ऑनलाइन अर्ज कसा भरावा, आवश्यक कागदपत्रे कोणती आहेत, बी-स्टेटमेंट कसे भरावे तसेच बँक खात्याची माहिती ऑनलाईन अर्जामध्ये कशी भरावी याबाबत संगणकीय सादरीकरणाद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गजानन पांपटवार यांनी केले. कार्यशाळेत विद्यार्थी आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या आयोजनासाठी विजय तारू यांनी विशेष परिश्रम घेतले.

# काकांडी येथे नागपंचमी उत्साहात साजरी, पंचक्रोशीतील अनेक गावांतील भक्तांनी घेतले दर्शन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील काकांडी गावात नागपंचमी सणा निमित्ताने नागदेव मंदिरात विधीवत पूजन करण्यात आले तर नागपंचमी सणानिमित्त यात्रा भरविण्यात आली होती. पंचक्रोशीतील अनेक गावांतील हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेऊन यात्रा निमित्ताने आलेल्या अनेक दुकानातून मूर्तीसह अनेक वस्तू खरेदी केल्या.

ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता तर ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने नाल्या व गावातील प्रमुख रस्त्यांची साफ-सफाई व मंदिर परिसरात मुरूम टाकून रस्ता तयार करण्यात आला होता.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १७ ऑगस्ट रोजी नागपंचमी सणानिमित्त काकांडी गावात नागदेव मंदिरात विधीवत पूजन व गावात यात्रा भरविण्यात आली होती. सकाळपासून पंचक्रोशीतील अनेक गावांतील हजारो भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिराचे पुजारी क्रांतीकिरण मगरे यांनी विधीवत पूजन केले तर गेल्या अनेक वर्षांपासून आनंदराव मगरे, राहुल मगरे अशोक मगरे, प्रवीण मगरे, विनायक मगरे, गणपतराव हणमंते हे परिवारातील सदस्य हे गेल्या अनेक वर्षांपासून नागपंचमी सणानिमित्त परंपरा जोपासत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

माजी सरपंच सुदिन बागल व मित्र परिवार यांनी यात्रेसाठी आलेल्या भाविक-भक्तांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार व्यवस्था केली होती. काकांडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने चेअरमन तथा मार्गदर्शक हणमंत भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच शरद भवर व ग्रामपंचायत सदस्य यांनी नागपंचमी यात्रेनिमित्त प्रमुख रस्त्यास गावातील नाले सफाई करून नागदेव मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून दबाई करून रस्त्याची दुरुस्ती केली. यात्रेनिमीत मंदिर परिसरात व गावातील विविध ठिकाणी प्रसाद, मिठाई, मूर्ती दुकानासह अनेक विक्रेत्यांनी खेळणीसह दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती तर लहान मुलांसाठी आकाश पाळणे व विविध खेळांचे दुकाने उभारण्यात आली होती.

यात्रा यशस्वीतेसाठी गावातील ज्येष्ठ नागरिक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व व्यंकटराव कोंके, दशरथ पाटील बागल, शंकर पाटील बागल यांच्यासह युवक व गावातील नागरिकांनी परिश्रम घेतले.

# लोकजागर सेवाभावी संस्थेचे कार्य समाजहितकारक -अश्विनी कानकाटे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जनहित डोळ्यांसमोर ठेवून लोकजागर सेवाभावी संस्थेचे विश्वस्त सातत्याने सामाजिक उपक्रम राबवीत आहेत तो निश्चितच प्रशंसनीय आणि समाजहितकारक आहे, असे प्रतिपादन मायभारत नांदेडच्या जिल्हा युवा अधिकारी श्रीमती अश्विनी कानकाटे यांनी केले.



कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ. कानकाटे बोलत होत्या. लोकजागर सेवाभावी संस्थेच्यावतीने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सावित्रीबाई फुले नगरातील सारनाथ बुद्ध विहार येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. मारोती गायकवाड यांची उपस्थिती होती.

यावेळी वक्तृत्त्व स्पर्धेचे उद्घाटन मायभारत नांदेडच्या जिल्हा युवा अधिकारी श्रीमती अश्विनी कानकाटे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून नायगाव येथील शरदचंद्र महाविद्यालयाचे प्राचार्य बलभीम वाघमारे, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे, पीपल्स महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अमोल काळे, प्रा. डॉ. कळीमठ यांची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकजागर सेवाभावी संस्थेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या सामाजिक उपक्रमांविषयी प्रकाश टाकून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. लोकजागर सेवाभावी संस्था ही निरपेक्ष भावनेतून समाजजागृतीचे कार्य करीत असून, या संस्थेच्या सामाजिक कार्यक्रमातून निश्चितच समाजाचे हित होईल, अशी आशाही उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी वक्तृत्त्व स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहीर गौतम पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. प्रबुद्ध चित्ते यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी लोकजागर सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश चित्ते, सचिव जयश्री चित्ते, राहुल सिंगारपुतळे, प्रदीप चिखलीकर, सुमेध सोनकांबळे, तुषार वाघमारे, राजू गोरे, स्वप्नील सोनकांबळे व विक्की सोनसळे यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. हंसराज वैद्य यांचा सप्तरंगतर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव



**नांदेड (प्रतिनिधी)–** वैद्यकीय सेवा ही केवळ व्यवसाय न मानता सामाजिक बांधिलकीचे सेवा माध्यम म्हणून आयुष्यभर कार्यरत राहिलेले ज्येष्ठ समाजसेवक, वैद्यकीय विशेषज्ञ आणि ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांचे अभ्यासक डॉ. हंसराज वैद्य यांच्या बहुआयामी सेवा कार्याचा केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण कार्यालय, नांदेड तथा सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य विशेष सोहळ्यात 'जीवन गौरव अर्थात लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ व पुरस्कार देऊन डॉ. वैद्य यांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यास नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे, खासदार डॉ. अजित गोपछडे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, नांदेड महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, समाज कल्याण तथा सामाजिक न्याय विभागाचे सहआयुक्त शिवानंद मिनगिरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्तर व दक्षिण विधानसभा मतदारसंघांचे भाजप अध्यक्ष, संजय कोडगे, चैतन्यबापू देशमुख तसेच सप्तरंग सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा डॉ.सान्वी जेठवाणी, त्यांच्या गुरुमाँ तथा ज्येष्ठ सहकारी भगिनी, उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाचे कार्यकारिणी सदस्य आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

'जेथे कमी, तेथे आम्ही' या सेवाभावी ब्रीदवाक्याचा उल्लेख करत निवेदकांनी डॉ. वैद्य आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजातील गरजू घटकांसाठी केलेल्या अखंड कार्याचा गौरव केला. पुरस्कार स्वीकारताना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या सेवाभावी वाटचालीला दाद दिली.

# आ. श्रीजया चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे पिंपळढव प्रकल्पाला 'नाबार्ड' कडून मिळणार ८५.४१ कोटी मंजूर

**भोकर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील महत्त्वपूर्ण पिंपळढव साठवण तलाव प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने नाबार्डच्या वतीने ८५.४१ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यासाठी सातत्याने प्रयत्नशील होत्या. राज्याच्या जलसंपदा विभागाने बुधवारी या संदर्भातील शासन निर्णय जाहीर केला.

पिंपळढव प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे १३१.११ कोटी रुपये असून, त्यापैकी सुमारे ५५.७० कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच प्राप्त झाला आहे. उर्वरित ८५.४१ कोटी रुपयांसाठी आ. श्रीजया चव्हाण सातत्याने पाठपुरावा करीत होत्या. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पत्र व्यवहार करून, तसेच अनेकदा प्रत्यक्ष भेटी घेऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राज्य सरकारने राज्यातील विविध सिंचन प्रकल्पांसाठी नाबार्डकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून देताना त्याअंतर्गत पिंपळढव साठवण तलावालाही ८५.४१ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे हा महत्त्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडले आहे. या प्रकल्पामुळे मौजे पिंपळढव, डौर, जामदरी, सिद्धार्थ नगर, वाडी, मातूळ, लगळूद व रावणगाव या गावांच्या परिसरातील सुमारे ६६० हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

# सलग सहाव्या वर्षी आयसीएमआर शिष्यवृत्तीवर नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मोहोर

## दोन एमबीबीएस विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित शिष्यवृत्तीसाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेडने वैद्यकीय शिक्षणाबरोबरच संशोधन क्षेत्रात आणखी एक मानाची कामगिरी नोंदवली आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद यांच्या प्रतिष्ठित संशोधन शिष्यवृत्तीसाठी यंदा महाविद्यालयातील द्वितीय वर्ष एमबीबीएसचे विद्यार्थी सद्भाव दीपक भुरे आणि कु. तरुशी सिवाच यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे, महाविद्यालयाने सलग सहाव्या वर्षी ही राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित शिष्यवृत्ती मिळविण्याची गौरवशाली परंपरा कायम राखली आहे.



देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमधून हजारो संशोधन प्रस्ताव सादर होत असताना ICMR-STS शिष्यवृत्तीसाठी निवड होणे हे विद्यार्थ्यांच्या संशोधन कौशल्याची, वैज्ञानिक दृष्टिकोनाची आणि बौद्धिक क्षमतेची राष्ट्रीय स्तरावर झालेली दखल मानली जाते. मराठवाड्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सलग सहा वर्षे हे यश संपादन करणे ही संपूर्ण प्रदेशासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, वैज्ञानिक विचारसरणी आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षणाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.

# बिलोली तालुक्यातील बामणी येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची तीन पदे रिक्त; शिक्षक देण्याची गावकऱ्यांची मागणी

**बिलोली (प्रतिनिधी)–** तालुक्यातील मौजे बामणी बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांची तीन पदे गेल्या कांही वर्षांपासून रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे शाळेला तातडीने पूर्णवेळ शिक्षक द्यावेत, अशी मागणी आता गावकऱ्यांमधून केली जात असून तत्काळ शिक्षक न दिल्यास शिक्षण विभागातच शाळा भरविण्याचा इशारा गावकऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.



सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपला पाल्य मागे राहु नये या उद्देशाने पालकवर्ग एकीकडे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आपल्या मुलाला प्रवेश घेण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी संख्या वरचेवर वाढून जिल्हा परिषदेच्या शाळांची संख्या कमी होत असताना पहावयास मिळत आहे. मराठी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी गळती थांबविण्यासाठी एकीकडे शासन नवनवीन उपाययोजना करत आहे. तर दुसरीकडे बिलोली तालुक्यातील मौजे बामणी येथील जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या चांगली असताना या शाळेत तब्बल तीन शिक्षकांची पदे मागील अनेक महिन्यांपासून रिक्त होत आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने पालक वर्ग चिंतेत सापडला आहे.

मौजे बामणी येथे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतची जिल्हा परिषदेची शाळा आहे. सध्या या शाळेत ५१ मुली आणि ७३ मुले असे एकूण १२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या सुयोग्य शिक्षणासाठी शासनाकडून एकूण सात शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आली आहेत. मात्र, मंजुरी असूनही येथे प्रत्यक्षात केवळ चारच शिक्षक कार्यरत असून, तब्बल तीन शिक्षकांची पदे रिक्त आहेत. विशेष म्हणजे सध्या कार्यरत असलेल्या चार शिक्षकांपैकी दोन शिक्षक हे मागील महिनाभरापासून निवडणूक विभागाने ठरवून दिलेल्या एसआरआयच्या कामात व्यस्त आहेत. तर उर्वरित दोन शिक्षकांपैकी एखादे शैक्षणिक काम असल्यास एका शिक्षकास शाळा सोडून जावे लागल्यास एकाच शिक्षकांवर शाळेची व १२४ विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देण्याची वेळ येत असल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली असून, शाळेत मोठी विद्यार्थी संख्या असूनही पुरेसे शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

एकीकडे शासन डिजिटल शाळा आणि प्रगत शिक्षणाचा दावा करत असताना, दुसरीकडे मात्र प्रत्यक्ष शिक्षकांची कमतरता असल्याने पालकांमध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे. रिक्त पदांमुळे कार्यरत असलेल्या चार शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असून, सर्व वर्गांमधील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन कोलमडले आहे. शिक्षण विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन बामणी येथील शाळेतील रिक्त पदे तातडीने भरावीत, अन्यथा शिक्षण विभागाच्या कार्यालयातच शाळा भरविण्याचा इशारा शालेय व्यवस्थापन समिती व गावकऱ्यांनी दिला आहे.

# शिवस्मारक मंडळाच्यावतीने गुणवंतांचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विष्णुपुरी येथील शिवस्मारक मंडळाच्या वतीने गावातील शासकीय सेवा, शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय सेवा, सामाजिक कार्ये आणि ललित कला आदी क्षेत्रात उत्तम यश मिळविलेल्या दोनशे विद्यार्थी आणि अधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा व नि:शुल्क आरोग्य चिकीत्सा शिबीर उत्साहात पार पडले.



आ. आनंदराव बोंढारकर यांनी विष्णुपुरी शिवस्मारक येथे भेट देऊन सार्वजनिकरीत्या आयोजित केलेल्या राष्ट्रीय ध्वजारोहण कार्यक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाची सुरूवात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने झाली. निवृत्त पीएसआय माणिक हंबर्डे यांचे हस्ते शिवस्मारक मैदानावर ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र गीताने आणि भारत माता की जय, या घोषणेने उपस्थितांत नवचैतन्य निर्माण झाले.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आयोजलेल्या गुणवंतांच्या सत्कार सोहळ्यास डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, कॅप्टन कस्तुरे, कॅप्टन पोतगणते आणि गट शिक्षणाधिकारी मोतीराम राठोड या मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले होते. या सर्वांनी विष्णुपुरी गावातील विविध क्षेत्रातील गुणवंतांचा प्रशस्तीपत्रे, शाल आणि फुले देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी सर्व मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. मार्गदर्शन भाषणात सर्व पाहुण्यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी यशस्वी शैक्षणिक कारकिर्दीसाठी शुभेच्छाही दिल्या.

कार्यक्रमास शिवस्मारक मंडळाचे पदाधिकारी माणिक हंबर्डे, शिवाजी हंबर्डे, डॉ. गोविंद हंबर्डे, रामचंद्र शेंबोले, महादू भारती, प्रभू हंबर्डे, मारोती हंबर्डे आणि गावातील प्रतिष्ठित नागरीक, शंकरराव हंबर्डे, धारोजीराव हंबर्डे, माजी जि. प. सदस्य साहेबराव हंबर्डे, गोविंदराव हंबर्डे, रामराव हंबर्डे, बालाजी हंबर्डे, दत्ता हंबर्डे, शहाजी हंबर्डे, दीपक हंबर्डे यासह अनेकांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश हंबर्डे, बाबुराव हंबर्डे, क्षीतीज हंबर्डे, चंद्रकांत हंबर्डे यांचे विशेष सहकार्य लाभले.




# VIHAANच्या रूपाने भारताची ऐतिहासिक कामगिरी

## देशातील पहिली स्वदेशी ब्रॉडबँड नेटवर्किंग चिप तयार

**भारताने चिप डिझाइन आणि सेमीकंडक्टर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. चेन्नईस्थित अहिसा डिजिटल इनोव्हेशन्स या स्टार्टअपने देशातील पहिली स्वदेशी ब्रॉडबँड नेटवर्किंग सिस्टम-ऑन-चिप (SoC) 'VIHAAN' विकसित केल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे या चिपने पहिल्याच उत्पादन प्रयत्नात अपेक्षेप्रमाणे काम केले. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात याला 'फर्स्ट-पास सिलिकॉन सक्सेस' म्हटले जाते. पहिल्याच प्रयत्नात चिप योग्य प्रकारे कार्यरत होणे ही अर्धसंवाहक उद्योगातील दुर्मीळ आणि महत्त्वाची कामगिरी मानली जाते.**




### VIHAAN चिपचा वापर कुठे होणार?

VIHAAN ही ब्रॉडबँड नेटवर्किंगसाठी तयार करण्यात आलेली चिप आहे. भविष्यात तिचा वापर घरांमध्ये आणि कार्यालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या Wi-Fi राउटर, ब्रॉडबँड राउटर आणि फायबर-आधारित उपकरणांमध्ये केला जाऊ शकतो. या चिपच्या माध्यमातून भारतात वापरल्या जाणाऱ्या नेटवर्किंग उपकरणांमध्ये स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे परदेशातून आयात कराव्या लागणाऱ्या नेटवर्किंग हार्डवेअरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

### VIHAAN म्हणजे काय?

VIHAAN ही भारतातील स्वदेशी ब्रॉडबँड नेटवर्किंग सिस्टम-ऑन-चिप आहे. ती मुक्त मानकावर आधारित RISC-V आर्किटेक्चरवर विकसित करण्यात आली आहे. या चिपमध्ये सी-डॅक (C-DAC) अर्थात प्रगत संगणन विकास केंद्राने विकसित केलेल्या स्वदेशी VEGA प्रोसेसरचा वापर करण्यात आला आहे. चेन्नईस्थित फॅबलेस अर्धसंवाहक कंपनी अहिसा डिजिटल इनोव्हेशन्सने या चिपची रचना केली आहे. या प्रकल्पाला भारत सेमीकंडक्टर मिशन आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या डिझाइन-लिंक्ड प्रोत्साहन (DLI) योजनेअंतर्गत आर्थिक आणि तांत्रिक मदत मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### VIHAAN चिप कशी काम करणार?

VIHAAN चिपचा मुख्य उद्देश ब्रॉडबँड नेटवर्कमधील इंटरनेट डेटाची प्रक्रिया जलद आणि सुरक्षित करणे हा आहे. फायबर केबलमधून येणारा उच्च-वेगाचा इंटरनेट डेटा ही चिप स्वीकारते आणि त्याचे पुढील नेटवर्क उपकरणांसाठी योग्य स्वरूपात रूपांतर करण्यास मदत करते. त्यानंतर हा डेटा Wi-Fi किंवा LANच्या माध्यमातून संबंधित उपकरणांपर्यंत पोहोचवला जातो. नेटवर्कमधून होणाऱ्या डेटाच्या वाहतुकीचे व्यवस्थापन करून योग्य उपकरणापर्यंत माहिती जलद पोहोचवण्यास चिप मदत करते. नेटवर्कची सुरक्षितता वाढवण्यासाठी चिपमध्ये हार्डवेअर रूट ऑफ ट्रस्ट, सिक्युअर बूट आणि क्रिप्टोग्राफिक इंजिन यांसारख्या सुरक्षा सुविधा देण्यात आल्या आहेत. ही चिप अहिसा राउटर ओएस (AROS) वर कार्य करणार आहे. त्यामुळे राउटर, मोडेम आणि ॲक्सेस पॉइंट यांसारख्या नेटवर्किंग उपकरणांमध्ये तिचे एकत्रीकरण करणे सुलभ होऊ शकते.

### FTTH आणि ब्रॉडबँडसाठी उपयोग

VIHAANमुळे FTTH (फायबर-टू-द-होम) नेटवर्क आणि ब्रॉडबँड राउटरसाठी स्वदेशी टेलिकॉम सिलिकॉन उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते. सध्या नेटवर्किंग उपकरणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक महत्त्वाच्या चिप्ससाठी भारताला परदेशी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागते. स्वदेशी चिप विकसित झाल्यामुळे या अवलंबित्वात भविष्यात घट होण्याची शक्यता आहे.

### भारतासाठी हे यश महत्त्वाचे का?

VIHAANच्या विकासामुळे भारताच्या अर्धसंवाहक आणि चिप-डिझाइन क्षेत्राला मोठी चालना मिळू शकते. स्वदेशी नेटवर्किंग चिप उपलब्ध झाल्यास परदेशी हार्डवेअरवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. याशिवाय दूरसंचार क्षेत्रातील सायबर सुरक्षेचे धोके आणि पुरवठा साखळीशी संबंधित अडचणी कमी करण्याच्या दृष्टीनेही स्वदेशी तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरू शकते. भारतामध्ये चिप डिझाइनपासून प्रत्यक्ष उत्पादनासाठी उपयुक्त तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता वाढत असल्याचेही या यशातून दिसून येते. सरकारच्या डिझाइन-लिंक्ड प्रोत्साहन योजना आणि 'सेमिकॉन इंडिया' कार्यक्रमाला यामुळे बळ मिळण्याची शक्यता आहे. अर्धसंवाहक चिप विकसित करताना पहिल्याच उत्पादन प्रयत्नात ती अपेक्षेप्रमाणे कार्यरत होणे हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. VIHAANने पहिल्याच प्रयत्नात ही कामगिरी केल्याने भारताच्या स्वदेशी चिप-डिझाइन क्षमतेबाबतचा आत्मविश्वास आणखी वाढला आहे.




# थेंबही न वापरता चमकणार कार; पुण्याच्या नितीनचे अभिनव तंत्रज्ञान

**कार धुण्यासाठी पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र, पाण्याची टंचाई असलेल्या भागांमध्ये ही बाब मोठी समस्या ठरते. याच समस्येवर उपाय शोधण्यासाठी पुण्यातील नितीन शर्मा यांनी दोन वर्षे संशोधन केले. सुमारे ६०० विविध सूत्रे आणि पद्धतींच्या चाचण्या घेतल्यानंतर त्यांनी पाण्याचा वापर न करता कार स्वच्छ करण्याचे वनस्पती आधारित सूत्र विकसित केल्याचा दावा केला आहे.**



नितीन यांचे कुटुंब ऑटोमोबाइल व्यवसायाशी संबंधित आहे. उन्हाळ्यात पाण्याची पातळी खालावल्याने त्यांच्या परिसरातील बोअरवेल कोरड्या पडत असत. परिणामी, वाहनांच्या देखभालीसाठी येणाऱ्या कार धुण्याचे कामही ठप्प होत असे. पाण्याच्या टंचाईचा थेट परिणाम व्यवसायावर होत असल्याने केवळ पाण्याचे नवीन स्रोत शोधण्यापेक्षा कार धुण्याच्या प्रक्रियेतून पाण्याचाच वापर कसा कमी किंवा पूर्णपणे दूर करता येईल, याचा विचार नितीन यांनी सुरू केला. सामान्यतः एका कारच्या धुलाईसाठी सरासरी २५ लिटर पाण्याचा वापर होतो. त्यामुळे पाण्याची कमतरता असलेल्या भागांमध्ये पाण्याशिवाय कार स्वच्छ करण्याचे तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते.

» ६०० सूत्रांच्या चाचण्यांनंतर मिळाले यश : पाण्याशिवाय कार स्वच्छ करणे तांत्रिकदृष्ट्या सोपे नव्हते. कारण पाण्याचा वापर न करता वाहनाच्या पृष्ठभागावरील धूळ आणि माती साफ करताना रंगावर ओरखडे पडण्याचा धोका असतो. नितीन यांनी सुमारे दोन वर्षे सातत्याने विविध प्रयोग केले. या काळात सुमारे ६०० वेगवेगळ्या सूत्रांची आणि पद्धतींची चाचणी केल्यानंतर त्यांनी वनस्पतीआधारित सूत्र विकसित केल्याचे सांगितले आहे. हे सूत्र कारच्या पृष्ठभागावरील धूळ, ग्रीस आणि अन्य मळ सैल करून तो सुरक्षितपणे स्वच्छ करण्यास मदत करते.

» गंजापासूनही संरक्षण? : या वनस्पतीआधारित सूत्राचा आणखी एक फायदा असल्याचा दावा करण्यात आला आहे. कारच्या पृष्ठभागावर तयार होणारा थर गंजरोधक आवरणाप्रमाणे काम करण्यास मदत करतो. त्यामुळे वाहनाच्या धातूच्या भागांचे गंजापासून संरक्षण होण्यास हातभार लागू शकतो. कार स्वच्छ केल्यानंतर तिच्या पृष्ठभागावर चमकही येते. विशेष म्हणजे या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करण्याची आवश्यकता राहत नाही.

» १०० मिलिलिटर द्रावणात कारची स्वच्छता : नितीन यांनी विकसित केलेले हे तंत्रज्ञान 'गो वॉटरलेस' (Go Waterless) या नावाने उपलब्ध आहे. केवळ १०० मिलिलिटर द्रावणाच्या साहाय्याने एक संपूर्ण कार स्वच्छ करता येते, असा दावा करण्यात आला आहे. पाण्याची वाढती टंचाई, वाहनांची वाढती संख्या आणि पाण्याचा अपव्यय रोखण्याची गरज लक्षात घेता, पाण्याशिवाय वाहन स्वच्छ करण्याचे असे तंत्रज्ञान भविष्यात अधिक महत्त्वाचे ठरू शकते.

### पाण्याशिवाय कार कशी स्वच्छ?

नितीन यांनी विकसित केलेल्या वनस्पतीआधारित सूत्राची प्रक्रिया अशी : या द्रावणाची फवारणी कापडावर करून त्याचा वापर कारच्या बाहेरील पृष्ठभागावर केला जातो. हे द्रावण धूळ आणि ग्रीसचे कण सैल करण्यास मदत करते. द्रावणातील नैसर्गिक घटकांमुळे वाहनाच्या पृष्ठभागावर एक गुळगुळीत थर तयार होतो. त्यामुळे कापडाने मळ साफ करताना धुळीमुळे पृष्ठभागावर ओरखडे पडण्याचा धोका कमी होतो. या सूत्रामध्ये पाच प्रकारच्या वनस्पतींचे अर्क आणि सर्फेक्टंट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. हे घटक वाहनाच्या रंगाच्या किंवा धातूच्या पृष्ठभागापासून मळ वेगळा करण्यास मदत करतात. या प्रक्रियेमुळे धूळ आणि माती वाहनाच्या पृष्ठभागाला घट्ट चिकटून राहत नाही. त्यामुळे कापडाच्या साहाय्याने ती सहजपणे साफ करता येते.

# मुलांचे 'ब्लू आधार' 30 सप्टेंबरपर्यंत मोफत अपडेट करा; त्यानंतर शुल्क लागू

**आपल्या घरातील ५ ते १५ वर्षे वयोगटातील मुलाचा आधार अद्याप अपडेट केला नसेल, तर ३० सप्टेंबरपूर्वी हे काम करून घ्या. या मुदतीपर्यंत मुलांचा 'ब्लू आधार' मोफत अपडेट करता येणार आहे. त्यानंतर आधार अपडेट करण्यासाठी शुल्क द्यावे लागू शकते. आधार केंद्रावर जाण्यापूर्वी ऑनलाइन अपॉइंटमेंट घेतल्यास वेळेची बचत होऊ शकते.**

» मुलांचा 'ब्लू आधार' म्हणजे काय? : लहान मुलांसाठी तयार करण्यात येणाऱ्या आधार कार्डला सामान्यतः 'ब्लू आधार' असे म्हटले जाते. शाळेत प्रवेश घेण्यापासून विविध सरकारी योजना, शिष्यवृत्ती, बँक खाते किंवा बचत योजना आणि पासपोर्टसाठीही मुलांच्या आधारचा उपयोग होतो. लहान मुलांचा आधार तयार करताना सुरुवातीला बायोमेट्रिक माहिती घेतली जात नाही. त्यामुळे मूल ५ वर्षांचे झाल्यानंतर आणि पुन्हा १५ वर्षांचे झाल्यानंतर आधारमध्ये अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक असते.

» मुलांचा आधार अपडेट करणे का आवश्यक? : ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांच्या आधारमध्ये त्यांच्या पालकांची माहिती किंवा पालकांच्या आधारशी संबंधित तपशील जोडलेले असतात. मात्र, मूल मोठे झाल्यानंतर त्याची ओळख अधिक अचूकपणे नोंदवण्यासाठी बायोमेट्रिक माहिती घेणे आवश्यक असते. मुलांच्या आधारचा उपयोग शाळेत प्रवेश, सरकारी बालकल्याण योजना, शिष्यवृत्ती, पासपोर्ट, आरोग्यसेवा, लसीकरणाच्या डिजिटल नोंदी तसेच प्रवासादरम्यान वयाचा पुरावा म्हणूनही होऊ शकतो. त्यामुळे मुलाचा आधार वेळेत अपडेट करून घेणे महत्त्वाचे आहे.

» 'ब्लू आधार' कसा अपडेट कराल? : मुलाचा आधार अपडेट करण्यासाठी पालकांना आधार सेवा केंद्राला भेट द्यावी लागते. ५ आणि १५ वर्षांच्या वयात होणाऱ्या अनिवार्य अद्ययावतीकरणात मुलाची बायोमेट्रिक माहिती आधारशी जोडली जाते. यासाठी मुलाला आधार केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते. तेथे मुलाच्या बोटांचे ठसे आणि डोळ्यांच्या बुबुळांचे स्कॅन घेतले जाते. त्यामुळे हे अद्ययावतकरण केवळ ऑनलाइन करता येत नाही. आधार केंद्रावर गर्दी टाळण्यासाठी आधीच ऑनलाइन अपॉइंटमेंट घेणे फायदेशीर ठरते.

» ऑनलाइन अपॉइंटमेंट कशी घ्याल? : सर्वप्रथम uidai.gov.in किंवा appointments.uidai.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. तेथे 'Book an Appointment' या पर्यायावर क्लिक करा. त्यानंतर आपले शहर किंवा जिल्ह्यातील आधार सेवा केंद्र निवडा. काही ठिकाणी आधार सेवा केंद्रासाठी ASK असा उल्लेख केलेला असू शकतो. 'Proceed to Book Appointment' या पर्यायावर क्लिक करा. आपला मोबाइल क्रमांक आणि संकेताक्षर (कॅप्चा) भरा. मोबाइलवर आलेला OTP टाकून प्रवेश करा. त्यानंतर 'Update Aadhaar' हा पर्याय निवडा. मुलाची आवश्यक माहिती भरा. आपल्या सोयीची तारीख आणि उपलब्ध वेळ निवडा. भरलेली सर्व माहिती काळजीपूर्वक तपासा आणि अर्ज सादर करा. अपॉइंटमेंटची पावती जतन करून ठेवा. शक्य असल्यास तिची छापील प्रतही सोबत ठेवा. आधार केंद्रावर जाताना ही कागदपत्रे सोबत ठेवा.

# प्रवासाचे फोटो इंटरनेटवर टाकताना सावधान!

## GPS नसतानाही AI शोधू शकते तुमचे ठिकाण...

**तुम्ही प्रवासाला गेल्यानंतर तेथील छायाचित्रे समाजमाध्यमांवर तातडीने शेअर करत असाल, तर सावध राहण्याची गरज आहे. कारण आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात AI केवळ छायाचित्रातील दृश्ये पाहून ते छायाचित्र नेमके कुठे काढले आहे, याचा अंदाज लावू शकते. विशेष म्हणजे यासाठी GPS, स्थान-टॅग किंवा छायाचित्रातील मेटाडेटाची आवश्यकता नसते. McAfee Labsच्या एका नव्या अभ्यासानुसार, छायाचित्रातील वास्तुकला, दिशादर्शक फलक, प्रसिद्ध स्थळे, रस्त्यांची रचना, वाहनांची वैशिष्ट्ये, परिसराची प्रकाशयोजना आणि स्थानिक सांस्कृतिक खुणांचे विश्लेषण करून AI एखाद्या ठिकाणाचा अंदाज लावू शकते. त्यामुळे प्रवासाचे फोटो ऑनलाइन शेअर करणे गोपनीयता आणि सायबर सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते.**



» २१ हजारांहून अधिक छायाचित्रांवर प्रयोग : McAfeeच्या संशोधकांनी तब्बल २१,२३६ प्रवासाशी संबंधित छायाचित्रांवर काही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींची चाचणी घेतली. यामध्ये Googleच्या Gemma 3 27B आणि Alibabaच्या Qwen 3 VL 30B या व्हिजन-लँग्वेज मॉडेलचा समावेश होता. या चाचणीत Gemma 3 ने सुमारे ८७ टक्के छायाचित्रांमध्ये योग्य शहर आणि देश ओळखला, तर Qwen 3 ने सुमारे ९१ टक्के प्रकरणांमध्ये योग्य स्थानाचा अंदाज लावला, असा दावा अभ्यासात करण्यात आला आहे.

» GPS किंवा स्थानाची माहिती आवश्यक नाही : या AI प्रणालींना स्थान शोधण्यासाठी GPS किंवा छायाचित्रातील EXIF माहिती यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नव्हती. त्याऐवजी छायाचित्रातील अनेक दृश्य संकेतांचे विश्लेषण करण्यात आले. यामध्ये इमारतींची रचना आणि वास्तुकला, प्रसिद्ध स्थळे आणि स्मारके, रस्त्यांवरील दिशादर्शक किंवा अन्य फलक, वाहनांचे प्रकार, प्रकाशयोजना, खाद्यपदार्थांचे स्थानिक स्टॉल, रस्ते आणि स्थानिक पायाभूत सुविधा, स्थानिक संस्कृतीशी संबंधित दृश्ये या संकेतांचा एकत्रित अभ्यास करून AI छायाचित्र काढले गेलेले ठिकाण ओळखण्याचा प्रयत्न करते. सामान्य समुद्रकिनारे, ग्रामीण रस्ते किंवा हॉटेलच्या खोल्यांसारख्या ठिकाणांचे अचूक स्थान शोधणे AIसाठी तुलनेने कठीण असल्याचेही अभ्यासात आढळले. मात्र, अशा छायाचित्रांमधूनही अनेक वेळा देश ओळखता आला.

» खासगी छायाचित्रांमधूनही स्थानाचा अंदाज : McAfeeने सार्वजनिकरीत्या कधीही प्रकाशित न केलेल्या १०२ खासगी छायाचित्रांचीही तपासणी केली. संशोधकांनी ChatGPT, Claude आणि Copilot यांसारख्या AI साधनांचा वापर करून या छायाचित्रांमधून स्थानाची माहिती मिळवता येते का, याचा अभ्यास केला. यावरून केवळ समाजमाध्यमांवरील छायाचित्रेच नव्हे, तर सामान्य खासगी छायाचित्रांमधूनही दृश्य संकेतांच्या आधारे स्थानाचा अंदाज लावता येऊ शकतो, असे अभ्यासातून समोर आले.

» सायबर गुन्हेगारांकडून होऊ शकतो गैरवापर : या तंत्रज्ञानाचा गैरवापर सायबर गुन्हेगारांकडून केला जाण्याची शक्यता आहे. एखाद्या व्यक्तीने प्रवासादरम्यान समाजमाध्यमांवर छायाचित्र शेअर केले आणि त्या छायाचित्रावरून त्याचे ठिकाण समजले, तर त्याचा आधार घेऊन फसवणुकीचे संदेश पाठवले जाऊ शकतात. उदाहरणार्थ, संबंधित व्यक्ती ज्या शहरात किंवा पर्यटनस्थळी आहे, त्याच ठिकाणाशी संबंधित स्थानिक टॅक्सी सवलत, हॉटेल ऑफर किंवा आपत्कालीन मदतीचा बनाव करून संदेश पाठवला जाऊ शकतो. संदेश विश्वासार्ह वाटल्याने व्यक्ती त्यातील दुव्यावर क्लिक करू शकते आणि त्यातून आर्थिक फसवणूक किंवा माहितीची चोरी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

» सुरक्षित राहण्यासाठी काय करावे? : प्रवासाचे फोटो समाजमाध्यमांवर शेअर करताना काही खबरदारी घेतल्यास धोका कमी करता येऊ शकतो. प्रवासादरम्यान प्रत्यक्ष वेळेत छायाचित्रे शेअर करणे टाळा. शक्य असल्यास घरी परतल्यानंतर प्रवासाचे फोटो समाजमाध्यमांवर प्रकाशित करा. आपल्या समाजमाध्यम खात्यांच्या गोपनीयता सेटिंग्ज तपासा. छायाचित्राच्या पार्श्वभूमीत घर, हॉटेल, प्रसिद्ध स्थळ, दिशादर्शक फलक किंवा ठिकाण ओळखण्यास मदत करणारी माहिती दिसत नाही ना, याची काळजी घ्या.

# उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना दरमहा २ हजार पॉकेटमनी?

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे सूतोवाच

**मुंबई(प्रतिनिधी)**–उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसाठी राज्य सरकारकडून एक दिलासादायक उपक्रम राबवण्याचा विचार सुरू आहे. मुलींना उच्च शिक्षण घेताना आर्थिक मदत मिळावी आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने 'कमवा आणि शिका' या योजनेच्या धर्तीवर दरमहा दोन हजार रुपये पॉकेटमनी देण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे प्रयत्न सुरू असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.



मुंबईत आयोजित एका संवादादरम्यान त्यांनी या प्रस्तावित योजनेबाबत भाष्य केले. राज्यातील अनेक मुलींना आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणात अडचणी येतात किंवा शिक्षण सोडावे लागते. अशा विद्यार्थिनींना शिक्षणासोबतच स्वतःच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी काही आर्थिक आधार मिळावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सुमारे १२ लाख विद्यार्थिनींना या प्रस्तावित उपक्रमाचा फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सध्या हा प्रस्ताव प्राथमिक स्वरूपात असून, याबाबत अद्याप कोणतीही अंतिम घोषणा झालेली नाही. ही योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी विद्यापीठे आणि मोठ्या महाविद्यालयांशी चर्चा करण्याचे नियोजन सरकार करत आहे. तसेच, कंपन्यांच्या 'सीएसआर' निधीच्या माध्यमातून विद्यार्थिनींना दरमहा ही आर्थिक मदत उपलब्ध करून देता येईल का, याबाबतही चाचपणी केली जात आहे.

# १५ ते २० कोटी रुपयांचा पाऊस पाडण्याचं आमिष; तेलंगणातील भोंदूबाबाला लातूरमधून अटक

**लातूर(प्रतिनिधी)**–नाशिक जिल्ह्यातील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातूनही आपण काही धडा घेतला की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण, अद्यापही राज्यातील अनेक भागात भोंदू बाबा आपले पाय पसरून बसले आहेत. तर, या बाबांच्या पाया पडणाऱ्या भक्तांची कमतरता नाही. पुण्यात एका बाबाचे चरण धुवून पाणी प्यायचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतर, आता, पंधरा ते वीस कोटी रुपयांचा पैशाचा पाऊस पाडण्याचं आमिष दाखवणारा बाबा लातूर (जिल्ह्यातून पुढे आला आहे. अल्पवयीन मुलीचा वापर करून अघोरी लक्ष्मीपूजा करण्याच्या प्रकरणात उदगीर ग्रामीण पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका तांत्रिकाला तेलंगणातून अटक केली आहे. बालाजी मंगल बलराज (वय ३८, रा. चिनार कोडमंगल, ता. पिटलम, जि. कामारेड्डी, तेलंगणा) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.





उदगीर तालुक्यातील करडखेल पाटीजवळ १६ ऑगस्ट रोजी हा प्रकार उघडकीस आला होता. पैशाचा पाऊस पाडण्यासाठी लक्ष्मीपूजेचा कथित अघोरी विधी करण्याची तयारी करण्यात आली होती. या विधीसाठी आंध्र प्रदेशातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा वापर करण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उदगीर ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत संभाव्य अनर्थ टाळला. याप्रकरणी महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि पुणे परिसरातील १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, यापूर्वी १३ संशयितांना ताब्यात घेण्यात आले होते. आता पोलिसांनी तेलंगणात कारवाई करत बालाजी मंगल बलराज याला अटक केली आहे. लक्ष्मीपूजेची जबाबदारी त्याच्याकडे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यातील कलम ३ (३) तसेच पॉक्सो कायद्यातील कलम १२ आणि १८ अन्वये गुन्हा दाखल आहे. अटक केलेल्या आरोपीसह इतर संशयितांची चौकशी सुरू आहे .या अघोरी विधीमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलीस करत आहेत. तपासादरम्यान आणखी काही अटक होण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त केली जात आहे. सदरील तांत्रिक हा व्यवसायाने नाभिक आहे. त्याने या सर्व लोकांशी संपर्क कसा केला होता? त्या संपर्कात सर्वप्रथम कोण आलं? या विधी करण्यामागे कोणती आघोरी कृती होती? या सर्व बाबींचा तपास आम्ही करत असल्याची माहिती उदगीरचे पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे यांनी दिली आहे.

# मराठा आरक्षणासाठी राजेंद्र दातेंच्या उपोषणाचा १२ वा दिवस

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – छत्रपती संभाजी नगरमध्ये मराठा आरक्षणासाठी राजेंद्र दाते यांनी सुरू केलेले उपोषण १२ व्या दिवशीही सुरू आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांच्यासोबत व्हीडीओ कॉलद्वारे झालेल्या चर्चेत दातेंनी मराठा समाजाच्या महत्त्वपूर्ण मागण्या सादर केल्या.

या मागण्यांमध्ये हैदराबाद गॅझेटियरचा उपयोग व त्याबाबत शासनाकडून स्पष्टीकरण, माधुरी पाटील खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन, तसेच गंगापूर तालुक्यातील काकासाहेब शिंदे व इतर २४२ मराठा शहीदांच्या स्मरणार्थ एक एकर जागा आणि ५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी प्रमुख होती.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गाप्रमाणेच राजकीय आरक्षण वगळून शैक्षणिक आणि सामाजिक सवलती मिळाव्यात, अशी मागणी दातेंनी केली. यामुळे समाजाची प्रगती होईल आणि कोणाच्याही हक्कावर गदा येणार नाही.

प्रलंबित नियुक्त्या तात्काळ देण्याचीही मागणी त्यांनी केली. जोपर्यंत लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार दातेंनी व्यक्त केला. शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित असून, लवकरच लेखी आश्वासन मिळण्याची शक्यता आहे.

**रक्तदान सर्वश्रेष्ठ दान**

# पुण्यात कथित अध्यात्मिक गुरुने तरुणीला भीती घालून मागवले अर्धनग्न फोटो

**पुणे (प्रतिनिधी)**- पुण्यातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक भोंदूगिरीचा प्रकार समोर आला आहे. एका २३ वर्षीय कथित आध्यात्मिक गुरूने एका तरुणीला भीती दाखवून तिच्याकडे अर्धनग्न फोटोंची मागणी केल्याची घटना घडली आहे. शरीरातील नकारात्मक ऊर्जा काढून टाकण्याचे आमिष दाखवून त्याने हा प्रकार केला. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

दिव्य जितेंद्र परमार (वय २३) असे अटक करण्यात आलेल्या कथित आध्यात्मिक गुरूचे नाव आहे. या प्रकरणी एका २२ वर्षीय तरुणीने कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिव्य परमार हा महाविद्यालयात व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असतानाच त्याने स्वतःला 'मोटिव्हेशनल स्पीकर' आणि सोशल मीडिया 'इन्फ्लुएन्सर' म्हणून प्रस्थापित करण्यास सुरुवात केली होती. वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षीच त्याने ठिकठिकाणी भाषणे देण्यास प्रारंभ केला होता.

कालांतराने त्याने सोशल मीडियावर स्वतःच्या नावाचे एक चॅनेल सुरू करून मोठा चाहता वर्ग तयार केला. पुढे तो या चाहत्यांकडून शुल्क आकारून व्याख्याने देऊ लागला. काही दिवसांनी त्याने स्वतःला 'आध्यात्मिक गुरू' म्हणून भासवण्यास सुरुवात केली. त्याच्या संपर्कात येणाऱ्या महिला आणि तरुणींना तो व्यायामासंबंधीच्या टिप्स देत असे. तुमची व्यायामातील प्रगती पाहायची असेल तर अर्धनग्न फोटो पाठवा, अशी मागणी तो करायचा आणि नकार दिल्यास काहींना भीतीही दाखवायचा.

## कागदपत्रं हरवले

माझे संगीता अशोक तारे या नावाचे इयत्ता दहावीचे मार्कमेमो, इयत्ता बारावीचे मार्कमेमो व सनद, बी एड चे मार्क मेमो आणि जातीचे प्रमाणपत्र बिलोली ते नांदेड बस प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा. **संपर्क**–संगीता अशोक तारे, मु.पो बडुर ता. बिलोली, जि. नांदेड
मो. ७२१८३६५१९८

## प्रकरण: जन्म नोंद घेणे बाबत.
## अर्ज क्र.९७
## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे श्री सितावार श्रीनिवास लक्ष्मणराव वयः ४४ वर्षे, धंदा व्यापार रा. धर्माबाद ता. धर्माबाद जि.नांदेड यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म–मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ अन्वये दि. ०५/०६/२०२४ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार श्री सितावार श्रीनिवास लक्ष्मणराव रा. धर्माबाद ता. धर्माबाद जि.नांदेड येथील रहिवासी असून यांचा जन्म दि. २१/०६/१९८० रोजी धर्माबाद येथे झाल्याची नोंद नगरपरिषद कार्यालय धर्माबाद ता. धर्माबाद जि.नांदेड येथे उपलब्ध नाही असे निबंधक (जन्म–मृत्यू नोंदणी) यांनी कळविले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते कि, अर्जदार नामे श्री सितावार श्रीनिवास लक्ष्मणराव यांची जन्म नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात या कार्यालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक: ०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यासाठी देण्यात येत आहे.

–स्वा–
**तहसीलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी ,**
**धर्माबाद**

## पाहिजेत

**धर्माबाद शिक्षण संस्था धर्माबाद संचालित**
**लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद**
**ता. धर्माबाद, जि. नांदेड**

**(थेट मुलाखती)**

धर्माबाद शिक्षण संस्था, धर्माबाद, जि. नांदेड ||बहुजन हिताय बहुजन सुखाय||

महाविद्यालयातील सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी घड्याळी तासिका तत्त्वावर अध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांचा आदेश जा.क्र.ससंउशिनां/घ.ता./अनु-२/२०२६-२७/२५८६८१७/२०२६ दि. ०५/०८/२०२६ नुसार खालील पदे भरण्यास ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्यानुसार खालील रिक्त पदे भरणे आहे. पात्र उमेदवारांनी थेट मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.क्र. | विषय | अनुदान प्रकार | घ.ता. तत्त्वावर नाहरकत दिलेली पदे | पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१ | मराठी | अनुदानीत | ०१ | संबंधित विषयात |
| ०२ | हिंदी | अनुदानीत | ०२ | पदव्युत्तर पदवी बी + उत्तीर्ण व NET/ SET/ Ph.D. उत्तीर्ण असणे बंधनकारक |

**अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र शासन निर्णय - २०१८/(१८५/१८) मशि-३ दि. १४/११/२०१८ अन्वये ठरून दिलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता NET/ SET/ Ph.D. उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील व सदरील शासन निर्णयाप्रमाणे सर्व अटी व शर्ती लागू राहतील.
२. शासन निर्णय अर्थसं-२०२२/प्र.क्र. १०५/(१)/मशि-३ दि. २७.०३.२०२३ मधील तरतुदीनुसार वेतन व मानधन शासनाकडून आर्थिक तरतूद मंजूर झाल्यानंतर मंजूर करण्यात येईल.
३. दि. ०३.११.२०१८ व ११.०२.२०२६ नुसार नियमित सहाय्यक प्राध्यापक पदांची विहित भरती प्रक्रिया पूर्ण करुन ते संबंधीत विषयाच्या पदावर रुजू होताच त्या विषयाकरीता तासिका तत्वावर नेमणूक केलेल्या अध्यापकाची सेवा आपोआप संपुष्टात येईल.
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१ दि. १७.१०.२०२२ नुसार कार्यवाही करण्यात येईल.
५. मुलाखतीस मूळ कागदपत्रासह उपस्थित राहावे.

**मुलाखतीचे स्थळ :- लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि. नांदेड (प्रशासकीय इमारत)**
**मुलाखतीचा दिनांक :-२५.०८.२०२६**
**वेळ :- ११.०० वाजता**

| अध्यक्ष | सचिव | प्राचार्य |
|---|---|---|
| धर्माबाद शिक्षण संस्था, धर्माबाद | धर्माबाद शिक्षण संस्था, धर्माबाद | लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद |

# अवघ्या चार महिन्यांत १० प्रकरणांमध्ये २२ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा

**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)**– उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाचे (फास्ट ट्रॅक कोर्ट) न्यायाधीश रवी कुमार दिवाकर यांच्याकडील मृत्युदंड आणि जन्मठेपेची शिक्षा होऊ शकणारे हत्येचे सुमारे १०० प्रलंबित खटले तातडीने जिल्हा न्यायाधीशांच्या कोर्टात वर्ग करण्यात आले आहेत. न्यायाधीश दिवाकर यांनी गेल्या अवघ्या चार महिन्यांत १० प्रकरणांमध्ये २२ आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा सुनावल्याने वकील आणि पक्षकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर हा मोठा प्रशासकीय निर्णय घेण्यात आला आहे.

मुझफ्फरनगरचे जिल्हा व सत्र न्यायाधीश वीरेंद्र कुमार सिंह यांनी एका विशेष प्रशासकीय आदेशाद्वारे न्यायाधीश दिवाकर यांच्या कोर्ट क्र. ३ मधील मृत्युदंड किंवा जन्मठेपेची तरतूद असलेले सुमारे ९७ ते १०० खटले स्वतःच्या कोर्टात परत मागवून घेतले आहेत. सरकारी वकील कुलदीप कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर गुन्ह्यांशी संबंधित हे सर्व खटले आता थेट जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयात चालवले जातील.

मुझफ्फरनगर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष प्रमोद त्यागी यांनी सांगितले की, न्यायाधीश दिवाकर यांच्या कोर्टातून सातत्याने फाशीच्या शिक्षा दिल्या जात असल्याने वकील आणि पक्षकारांमध्ये धास्ती निर्माण झाली होती.

## Change In Name

I HAVE CHANGED MY NAME FROM (OLD NAME) DEELIPSINGH BHAGILE TO (NEW NAME) DILIPSING BHAGILE.
ADDRESS: S/O: BABUSING BHAGILE, 11356 RAHUL SERVICEING CENTER, HINGOLI GATE, OPP. B.D. CHAVAN HOSPITAL NANDED MAHARASHTRA 431601.

## सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
## जाहीर प्रगटन

मा. आर.पी. शिंदे दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १२४२/२०२६
पुष्पाबाई व ईतर वि. निरंक ने. ता. ३०/०९/२०२६.

अर्जदार:–१. श्रीमती पुष्पाबाई भ्र. शेषराव घोगरे वय ६८ वर्षे, धंदा : घरकाम, २. प्रल्हाद पि. शेषराव घोगरे वय ४६ वर्षे, धंदा : शेती ३. नानाराव पि. शेषराव घोगरे वय ४१ वर्षे, धंदा : शेती सर्व रा. वाघाळा, ता. जि. नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा:– बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत...

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत शेषराव नानाराव घोगरे यांचा मृत्यु दिनांक ३०/०४/२०२६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ हा मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मुले आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्रमांक १ ते ३ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ३०/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

| क. लिपिक | सहा. अधिक्षक |
|---|---|
| सह दिवाणी न्यायालय, क. स्तर, नांदेड | दिवाणी न्यायालय व. स्तर, नांदेड |

## मुकदमा नंबर ४५–१४४७/१४४८ हिजरी
## मुकदमा मुतालेबा रूकसती जवजा का

फरीके अव्वल सय्यद शायद पिता अब्दुल पटेल उम्र २७ साल साकीन गौरी शलेगाव ता.नायगाव जिल्हा नांदेड मो.नंबर ७४९९८६६०२५
बनाम फरीके सानी रिहाना पिता अहेमद पठाण उम्र ३३ साल साकीन खानापूर ता.देगलूर, जिल्हा नांदेड मो.नंबर ८४४६७१७५८४

मुकदमा हाजामे सय्यद शायद ने रिहाना बिन पठान अहेमद के खिलाफ मुकदमा दायर की है के रिहाना बिन्त पठना अहेमद आपने ०३ मार्च २०२४ को सय्यद शायद पिता अब्दुल पटेल से अग्द उला किया है और बाद अग्द के आप ६ महिने तक है सय्यद शायद के साथ ठीक रही है । उसके बाद सय्यद शायद को सताना चालु की इसी आसना मे आपके बदन से एक लडकी पैदा हुई नाम आयशा फतेमा बिन्त सय्यद शायद है और अब १८ महिने से आपने मयके मे रही है और जियादा तर आपने मे रहने की जिद करते हो और शोहर के घर खुशगावारी से नन्दने आने को बेफिकर है इसी तालुक से दोन बार बैठक भी हुई फीर भी आप अपने मायके मे रहे रही हो और आपने जिद्द पर अढी रहे हो इसी तालुक से दफ्तर खजात से नोटीसे दिगई है दो नोटीस वापस किया है और दो नोटी लेकर भी आप हजीर होकर तहरीरी जवाब देने की तारीख पर गैरहजर रही हो और गैरहजरी की सुरत मे बहुत इन्तजार के बाद अब य अकबारी नोटीस दि जाह रही है । इस अकबारी इत्तला नोटीस के जरीय आपको आप पर लगाये गये उलजामात दुर करने और गलत फाहयमी दुर करने और खुश गवारी से शोहर के घर शोहर के साथ नादने आपसी से गलत फाहमी दुर हो इस अकबार से समझोता नोटीस दिई जाह रही है । आप १३/०९/२०२६ बरोज इतवार दोपहर २ से ४ बजे तक हाजीर आये और तहरीरी जवाब दे । अदम हाजरी की सुरत मे मुकदमा हाजा एक तरफा हो जायेगा और जिस के जिम्मेदार और जवाबदार आप रहीगी ।

नंबर १ नोटीस देणेवाला–सय्यद शायद पिता अब्दुल पटेल साकीन, गौरी शळेगाव ता.नायगाव जि.नांदेड मो. नंबर ७४९९८६६०२५
नंबर २ जिनको दि गई नोटीस–रिहाना पिता अहेमद पठाण साकीन, खानापूर ता.देगलूर जिल्हा नांदेड, मो.नंबर ८४४६७१७५८४

काजी शरीयत
हाफीज अब्दुल रहिम पिता.अब्दुल करीम
नागोबा मंदिर के पास, देगलूर जि.नांदेड

## बिलोली नगर परिषद कार्यालय बिलोली
## जाहीर सूचना: एकल महिलांचे सर्वेक्षण

बिलोली नगर परिषद हद्दीतील सर्व संबंधित नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, नगर परिषद हद्दीतील एकल महिला असलेल्या (विधवा, घटस्पोटीत, परित्यक्ता व अविवाहित ) ज्या महिला कुटुंब प्रमुख असून त्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह करतात अशा एकल महिलांच्या ३०/०८/२०२६ पर्यन्त सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षण अर्ज भरून घेण्यासाठी आवश्यक कागद पत्र खालील प्रमाणे आहेत.

१)एकपासफोटो २)आधारकार्ड ३)रेशनकार्ड ४)घटस्फोटीत असल्यास घटस्फोटाचे प्रमाण पत्र ५) विधवा असल्यास पतीचे मृत्यूप्रमाण पत्र अर्ज भरून घेण्याकरिता नगर परिषद कार्यालय येथे मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९०९६९७९२२३ यांच्याशी संपर्क करावा.

तरी बिलोली नगर परिषद हद्दीतील सर्व पात्र एकल महिलांनी आपले अर्ज विहित मुदतीत नगर परिषद बिलोली कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत जमा करावे. असे आवाहन करण्यात येत आहे

स्वा/–
(कल्पेश जाधव)
मुख्याधिकारी नगरपरिषद, बिलोली


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७८/२०२६
भारतमणी भ्र. नरसिम्मा सुर्गलोड व इतर निरंक

अर्जदार : १. भारतमणी भ्र. नरसिम्मा सुर्गलोड वय –७१ वर्षे, २. सुरेखा पि. रसिम्मा सुर्गलोड वय ४२ वर्षे, ३. विवेकानंद पि. नरसिम्मा उर्फ नार्सिम्हा सुर्गलोड वय – ३५ वर्षे सर्व रा. लोहारगल्ली, गांधी चौक ता. बिलोली जिल्हा नांदेड ४. सुनिता भ्र. राजू सोळंके वय– ४६ वर्षे रा. नाईकवाडे गल्ली बिलोली ता. बिलोली जि. नांदेड ५. वसुधा भ्र. रमेश तोटे वय –४५ वर्षे रा. रामकृष्ण नगर, वसमत रोड परभणी ता. जि. परभणी

विरूध्द
निरंक

विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत नरसिम्मा रामन्ना सुर्गलोड यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे कायदेशिर मुले आहेत. अर्जदार क्र. १ ते ३ रा. लोहारगल्ली, गांधी चौक ता. बिलोली जिल्हा नांदेड व अर्जदार क्र. ४. नाईकवाडे गल्ली बिलोली ता. बिलोली जि. नांदेड व अर्जदार क्र. ५. रा. रामकृष्ण नगर, वसमत रोड परभणी ता. जि. परभणी मयत नरसिम्मा रामन्ना सुर्गलोड यांचा मृत्यु दिनांक १८/०१/२०२६ रोजी त्यांचे राहते घर बिलोली ता. बिलोली जिल्हा नांदेड झाला. मयत नरसिम्मा रामन्ना सुर्गलोड यांचे अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत नरसिम्मा रामन्ना सुर्गलोड यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ३०/०९/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**सहा अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क. स्तर,**
**बिलोली**

## जाहीर प्रगटन

संचिका क्र. १६३/४०/क्षे.का.क्र.६(सिडको) २०२६–२७

**प्रकरण–नाव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रीकांत बाबूराव काळे रा. सिडको यांचा अर्ज दिनांक १०/७/२०२६ सादर केला आहे की, मनपा/सिडको घर क्र.-- सव्हे नं.--, गट नं. -- सदनिका क्र. २० ज्याचा महानगरपालिका मालमत्ता क्र. ११–६–१११० पीन नं. ४०५११०२०३३ मौजे सिडको यांचे नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने विक्रीखत दस्त क्र. २१२२/१९९८ दिनांक २२/६/१९९८ संमतीपत्र दिनांक १३/२/२०२६ वारसा व कोर्ट आदेश आरजेई क्र. १९२३/२१ दिनांक २२/१२/२१ आधारे सिडको/माणिकचंद ताराचंद काला, गोकुळ कॉलनी बी मधील एक दुकान नं. २० आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नावे वरीलप्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चतु:सिमा–** पूर्वेस---पश्चिमेस---
दक्षिणेस----उत्तरेस---विक्रीखताप्रमाणे

क्षेत्रीय अधिकारी
क्षेत्रीय कार्यालय क्र. ६ सिडको
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## शहरात चैन स्नॅचिंग करणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात; नऊ गुन्हे उघड, सात लाखांचा मुद्देमाल जप्त

### एसपी डॉ. निलाभ रोहन यांची माहिती



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लांबवणारे साखळीचोर (चैन स्नेचर) आणि शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), इतवारा व शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने संयुक्त कारवाई करत शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील तब्बल नऊ गंभीर गुन्ह्यांची उकल केली. या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून सोन्याचे दागिने, महागडे मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी असा एकूण ६ लाख ७४ हजार ७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत सांगितली.

शहर व परिसरात वाढत्या साखळीचोरीच्या घटनांची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी गुन्हे शोध पथकांना तात्काळ तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार इतवारा, शिवाजीनगर, भाग्यनगर, सोनखेड, नांदेड ग्रामीण व विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या घटनांचा समांतर तपास सुरू करण्यात आला. संशयित भागातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या विश्लेषणावरून (सायबर सेल) पोलीस पथकाने आरोपींचा माग काढला.

तपासादरम्यान पोलिसांनी आरोपी योगेश नरसिंग दासेवाड (वय १८, रा. चौफाळा, नांदेड), अरबाजखान ऊर्फ अब्बु आरेफखान पठाण (वय ३०, रा. फारुखनगर), गणेश राजाराम हिवराळे (वय २८, रा. नुरी चौक) व शिवाजी पुंडलिक डुबुकवाड (वय २५, रा. नुरी चौक) यांच्यासह अल्पवयीन बालकांना ताब्यात घेतले. आरोपींनी शक्तीनगर, चैतन्यनगर, पिरबुऱ्हाणनगर, श्रीनगर, वाघळा आणि अण्णाभाऊ साठे चौक परिसरात महिलांना गाठून मंगळसूत्र व सोन्याचे मणी हिसकावल्याची कबुली दिली. तसेच विमानतळ रस्ता परिसरात एका दुचाकीस्वाराला खंजरचा धाक दाखवून लुटल्याचा गुन्हाही या तपासात उघडकीस आला आहे.

## कोनाळे कोचिंग क्लासेसचा विद्यार्थीहितेषी उपक्रम

## ‘पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड’ व्याख्यानाला उत्स्फुर्त प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला, आत्मविश्वासाला आणि सकारात्मक विचारांना नवी दिशा देण्यासाठी कोनाळे कोचिंग क्लासेसच्यावतीने सीईटी सेंटर येथे इंटरनॅशनल माईंड पॉवर ट्रेनर शिवाजीराजे पाटील यांचे ‘पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड’ या विषयावर प्रभावी व प्रेरणादायी व्याख्यान झाले.

या व्याख्यानातून मानवी मनाची अफाट क्षमता, अवचेतन मनाची अमर्याद शक्ती, सकारात्मक विचारांची ताकद, ध्येय निश्चिती, सर्वोत्तम भूमिपुत्र तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानातील विपश्यना, ध्यान तथा सायन्स ऑफ ब्रेथ, पॉवर ऑफ स्पोकन वर्ड्स, सेल्फ टॉक आणि स्वतः च्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. लाईफ स्किल कोच शिवाजीराजे पाटील यांनी आपल्या ऊर्जावान वक्तृत्वशैलीतून सीईटीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या सुप्त क्षमतांना जागृत करण्यासाठी विद्वत्ताप्रचूर विचार मांडले. व्याख्यानादरम्यान विद्यार्थी मित्रमैत्रिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आपल्या विचारांची दिशा हीच आपल्या यशाची दिशा ठरवते. आपले यशापयश आपल्या मनाचा आरसा असतो. या विनर्स माईंडसेट अगेंस्ट लुजर्स माईंडसेट हा दृष्टिकोनाचा फरक विशद करणाऱ्या विचारातून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या मनावर सकारात्मक संस्कार करून ध्येयाकडे सातत्याने वाटचाल करण्याचे आवाहन सुप्रसिध्द स्टुडंट-पॅरेंट काऊन्सिलर शिवाजीराजे पाटील यांनी यावेळी केले.

प्रा. व्ही. डी. कोनाळे, प्रा. दत्तात्रय बिरादार व प्रा. योगेश कन्हेरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल कदम, प्रा. चंद्रकांत कदम, प्रभाकर येब्बावार, बॅच कोऑर्डिनेटर विठ्ठल बोगुलवार, सुरेश वडजे, पांडुरंग मॅकवाड, सुजाता वाघमारे, अजित येरकलवाड, सिमरन वाघमारे, रुपाली बिरादार, ममता सोनकांबळे, गिरीश पवार, विजय वादे व कैलास दळवे यांनी परिश्रम घेतले.

## ७० वर्षीय महिलेची जमीन लाटली, बचत गटाचे ४.७४ लाख रूपये गायब, ३ कोटींच्या सीएसआर फंडाचे आमिष

### नांदेडमध्ये फसवणुकीच्या ४ घटना उघड

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. एकाच वेळी जिल्ह्यातील कंधार, मांडवी, वजिराबाद आणि भाग्यनगर या चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत फसवणुकीचे चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जमीन खरेदी, बचत गटाचे पैसे, सीएसआर फंड आणि बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून नागरिकांची लाखो-कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

दि. २९ जुलै २०२६ रोजी दुपारी ४ वाजता, रजिस्ट्री ऑफिस, कंधार येथे आरोपी नामदेव मष्णा गडमड, दत्ता नामदेव गडमड, दोघे रा. कल्हाळी ता. कंधार आणि कविता बजरंग वानखेडे, रा. मनाठा यांनी संगनमत करून फिर्यादी सुजळाबाई मोहनबुवा गिरी, वय ७० वर्षे, रा. कल्हाळी यांना गोड बोलून त्यांच्या नावे असलेली ४.५ गुंठे जमीन खरेदी करून पैसे न देता फसवणूक केली.

या प्रकरणी पोस्टे कंधार येथे गु.र.नं. ३२१/२०२६, कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) BNS-२०२३ अन्वये गुन्हा दाखल असून तपास सपोनि मगर हे करीत आहेत.

दि. २८ जून २०२६ ते ३० जुलै २०२६ दरम्यान, पारडी, मांडवी ता. किनवट येथे आरोपी नवल शंकरराव जयस्वाल, वय २६, रा. कनकी, ता. किनवट आणि ओमकार दिंगबर शेळके, रा. महागाव यांनी संगनमत करून भारत फायनान्शियल इन्क्लुजन लि. कंपनीच्या महिला बचत गटाचे एकूण ४ लाख ७४ हजार १६३ रुपये महिला सदस्यांना न देता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरून फिर्यादी व महिला सदस्यांची फसवणूक केली.

फिर्यादी पुरुषोत्तम देवराव वाघमारे, वय ३७, रा. कनकी यांच्या फिर्यादीवरून पोस्टे मांडवी गु.र.नं. ९१/२०२६, कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) इछड-२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल असून तपास पोउपनि गायकवाड हे करीत आहेत.

## डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या शहीद दिनानिमित्त निर्भर मॉर्निंग वॉक



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी धर्मांध, अविवेकी व्यक्तींकडून कट रचून पुणे येथे हत्या करण्यात आली होती. या शहीद दिनानिमित्त नांदेड येथे निर्भय मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते.

पुणे येथे २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी ओंकारेश्वर परिसरातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर डॉ. नरेंद्र दाभोळकर मॉर्निंग वॉक करीत असताना त्यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी गोळीबार करून निर्दयीपणे हत्या करून त्यांना शहीद केले होते. त्यांच्या शरीराची हत्या झाली असली तरी त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करणे, धार्मिक-सामाजिक-आर्थिक व शारीरिक शोषणाला विरोध करणे या संविधानिक कार्याची व विवेकी विचाराची हत्यारे हत्या करू शकले नाहीत. त्यांच्या या संविधानिक कार्याच्या स्मरणार्थ नांदेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून शिवाजी महाराज पुतळ्याच्या मार्गाने गांधी पुतळ्यापर्यंत निर्भय मॉर्निंग वॉक करण्यात आला.

यामध्ये डॉ. बालाजी कोम्पलवार, प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड, डॉ. हंसराज वैद्य, डॉ. पुष्पा कोकिळ, तुळशीदास शिंदे, माणिक शिंदे, नागसेन तुळसे, रोहित सोनकांबळे, विकास इंगोले, अमृत कराळे, श्रीकांत चव्हाण आदींनी सहभाग घेतला.

निर्भय मॉर्निंग वॉकचा समारोप महात्मा गांधी पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी अभिवादन गीत गाऊन हिंसेला नकार व मानवतेच्या स्वीकाराचा निश्चय करीत प्रतिज्ञा घेण्यात आली.

## जलसंधारण दिनानिमित्त आज नांदेडमध्ये ‘वॉक फॉर वॉटर’ महावॉकथॉन

**नांदेड (प्रतिनिधी)**– माती व जलसंवर्धनाचे महत्त्व जनमानसात रुजविण्यासह जलसंधारणाच्या उपक्रमांमध्ये लोकसहभाग वाढविण्याच्या उद्देशाने २१ ऑगस्ट २०२६ रोजी जलसंधारण दिनानिमित्त नांदेड येथे ३ किलोमीटर अंतराची ‘वॉक फॉर वॉटर’ महावॉकथॉन आयोजित करण्यात आली आहे.

शासकीय तंत्रनिकेतन मैदान, नांदेड येथे सकाळी ६ वाजता कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. सकाळी ६ वाजता सहभागींचे आगमन व नोंदणी, ६.१५ वाजता वॉर्म-अप व पूर्वतयारी, ६.४५ वाजता मृद व जलसंधारणाची शपथ आणि ७ वाजता मान्यवरांच्या हस्ते महावॉकथॉनचा शुभारंभ होईल.

सकाळी ७ ते ८ या वेळेत ३ किमी ‘वॉक फॉर वॉटर’ महावॉकथॉन होणार असून, त्यानंतर सांगता समारंभात मान्यवरांचे जलसंधारणविषयक मार्गदर्शन, संदेश तसेच रील स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव व प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे.

## संतापजनक घटनेला न्याय: अल्पवयीन बालिकेवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपीला आयुष्यभर कारावास

### पीडितेला मनोधैर्य योजनेतून मिळणार मदत

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड तालुक्यातील एका गावातील ११ वर्षे ८ महिन्यांच्या बालिकेवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी आरोपी मल्हारी चांदू गुमडे (रा. दापका, ता. मुखेड, जि. नांदेड) याला पोक्सो न्यायालयाने उर्वरित संपूर्ण आयुष्यभर आजन्म कारावासाची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. पी. देशमुख यांनी बुधवार, दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजी हा ऐतिहासिक निकाल दिला. आरोपीला २० हजार रुपये दंडाचीही शिक्षा सुनावण्यात आली आहे.

दि. ८ मे २०२४ रोजी ११ वर्षे ८ महिन्यांची पीडिता घरासमोर खेळत असताना आरोपी मल्हारी गुमडे याने तिला खाऊ देतो, माझ्यासोबत चल असे सांगून सोबत नेले. त्यानंतर तिला शेतातील माळरानावरील एका झोपडीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे तपासातून समोर आले.

घटनेनंतर पीडिता झोपडीतून गावाजवळील रस्त्यावर आली. तेथे एका व्यक्तीला तिने आपल्यासोबत घडलेली घटना सांगितली. संबंधित व्यक्तीने पीडितेच्या गावात माहिती दिल्यानंतर तिचे वडील, नातेवाईक व इतर ग्रामस्थ शेतातील झोपडीकडे गेले असता आरोपी तेथे आढळून आला.

या प्रकरणी पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८३/२०२४ दाखल करण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानातील कलम ३६३, ३५४, ३५४(अ), ३७६(आय) तसेच पोक्सो कायद्यातील कलम ४, ६, ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक सी. आय. सय्यद यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान सरकार पक्षाने एकूण १३ साक्षीदार तपासले. साक्षीदारांच्या साक्षी, वैद्यकीय अहवाल तसेच विशेष सरकारी अभियोक्त्यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले. विशेष न्यायाधीश एस. पी. देशमुख यांनी पोक्सो कायद्याच्या कलम ६ अन्वये उर्वरित संपूर्ण आयुष्य आजन्म कारावासाची शिक्षा व २० हजार रुपये दंड ठोठावला.

## सौ. नंदिनी लाठकर यांचे निधन



**नांदेड(प्रतिनिधी)**– सिडको परिसरातील कल्याण नगरमधील रहिवासी सौ. नंदिनी नरेंद्र लाठकर यांचे बुधवारी मध्यरात्री हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी ४ वाजता सिडको येथील वैकुंठ धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, सून, जावई असा परिवार आहे. एसबीआयमधील सेवानिवृत्त व्यवस्थापक नरेंद्र लाठकर यांच्या त्या पत्नी होत.

## शिवाजी अंबुलगेकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील शिवशाही नगरमधील रहिवासी शिवाजी त्र्यंबकराव जोशी अंबुलगेकर यांचे बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सून, मुलगी, जावई, नातू, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी रात्री ७ वाजता गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सर्पदंशाने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू



**लोहा (प्रतिनिधी)** –तालुक्यातील धावरी येथील अल्पभूधारक शेतकऱ्याचे सर्पदंशाने दि. १९ ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान निधन झाले. मयत शेतकरी मुंजाजी बालाजी गाडेकर (बाळू पाटील) हे शेतीसह इतर वेळेत कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मोटारसायकल दुरुस्तीचे काम करत होते. ते सायंकाळी शेतात जाऊन जनावरांसाठी गवताचा भारा घेत असताना त्यांच्या पायाला विषारी सापाने दंश केला. या दुर्घटनेत त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर धावरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, चार मुली, भाऊ, बहीण असा परिवार आहे.

## तहसील कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याची छेडछाड झाल्याचा आरोप; ‘कामबंद’ आंदोलनाचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड येथील तहसील कार्यालयामध्ये एका महिला महसूल सेवक कर्मचाऱ्याची छेडछाड आणि छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी जिल्हा महसूल सेवक संघटना, नांदेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे दोषी कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. कारवाई न झाल्यास येत्या काही दिवसांत उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर तीव्र ‘कामबंद’ आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पीडित महिला कर्मचारी सध्या आवक-जावक शाखा तहसील कार्यालय नांदेड येथे कार्यरत आहेत, याच कार्यालयात कार्यरत असलेले महसूल सहायक बळीराम लक्ष्मणराव बैनवाड यांच्यावर या महिला कर्मचाऱ्याचा मानसिक छळ करणे, तसेच असभ्य व लज्जास्पद वर्तन करून छेडछाड केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पीडित महिलेने या त्रासाला कंटाळून अखेर दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी संघटनेकडे न्याय मागितला होता. यापूर्वी वरिष्ठांना दोन वेळा तोंडी कळवूनही कोणतीही दखल न घेतली गेल्याचे समोर आले आहे.

या गंभीर घटनेनंतर जिल्हा महसूल सेवक संघटनेने जिल्हाधिकारी निवेदन देऊन खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत. बळीराम लक्ष्मणराव बैनवाड (महसूल सहायक) यांना तातडीने निलंबित करण्यात यावे, या प्रकरणाची कार्यालयांतर्गत महिला तक्रार निवारण समिती मार्फत निष्पक्ष आणि तातडीने चौकशी व्हावी. मूळ सज्जावर कार्यमुक्त करणे, तहसील कार्यालयात कार्यरत इतर सर्व महसूल सेवकांना विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर यांच्या निर्देशानुसार त्यांच्या मूळ सज्ज्याच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

## स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने ‘हक्काच शहर मोहीम’

### खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या आयोजनात महानगरपालिका स्तरावरील हक्काचं शहर या मोहिमेचे उद्घाटन गुरुवार दि.२० ऑगस्ट रोजी करण्यात आले. दरम्यान या मोहिमेअंतर्गत प्रभागनिहाय नागरी समस्येवर जनसुनावणीच्या माध्यमातून आवाज उठविण्यात येणार आहे.

प्रदेश काँग्रेसच्या निर्देशनानुसार शहरातील नागरी समस्येवर मंथन करण्यासाठी शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने हक्काचं शहर ही मोहीम राबविण्यात येणार आहे. दरम्यान भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या आयोजनात गुरुवार दि.२० ऑगस्ट रोजी काँग्रेस पक्ष कार्यालय नवा मोंढा नांदेड येथे या मोहिमेचे उद्घाटन करून पत्रकार परिषद घेण्यात आली.

शहरातील प्रभागनिहाय पाणी, ड्रेनेज, लाईट, रस्ते, कर आदी नागरी मूलभूत समस्यांसह विविध समस्येवर खा. रवींद्र चव्हाण व महानगराध्यक्ष माजी उपमहापौर नगरसेवक अब्दुल गफ्फार यांच्या उपस्थितीत नागरी बैठका घेण्यात येणार आहेत. यानंतर महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे, अशी माहिती खा. रवींद्र चव्हाण व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी दिली.

यावेळी सुरेंद्र घोडजकर, डॉ. श्रावण रॅपनवाड, अनिल मोरे, आनंद चव्हाण, कुमार कुर्तडीकर, सत्यपाल सावंत, शेख पाशा, अलीम खान, गगन यादव, गजानन कल्याणकर, अंबादास रातोळे, रिजवान पटेल, नागराज सुलगेकर, शंकर शिंदे, सुरज शिंदे, संजय वाघमारे, दादाराव ढगे, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, बापूसाहेब पाटील, नईम शेख, गणेश कोकाटे, गोविंद पाटील, सोनू पाटील, अजर शेख, गौतम शिरसाट, संजय कवठेकर, प्रितम जोंधळे, संजय पोमदे, शिवकांता कदम, कलीम शेख, संदीप कदम, रामचंद्र गायकवाड आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com